



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील

www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक २३ * नांदेड * शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


## मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचे ठाकरेंचे संकेत

**मुंबई (प्रतिनिधी)–** विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. यानंतर महाविकास आघाडीतील धुसफुस समोर येत आहे. यामुळे आगामी महापालिकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र लढणार की स्वतंत्र मैदानात उतरणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. यावर आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी देखील आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहे. वेळ आल्यास स्वबळार लढण्याचा निर्णय घेणार असं उद्धव ठाकरे म्हणाले.



अंधेरीतील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडीयमवर ठाकरेंच्या शिवसैनिकांचा मेळावा पार पडला. यावेळी ते बोलत होते.

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांनी रणशिंग फुंकले असून शिवसैनिकांना तयारी करण्याचे आदेश दिले आहेत. महापालिका निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांच्या इच्छेप्रमाणे निर्णय घेणार असं सांगत त्यांनी स्वबळाचे संकेत दिले आहेत. त्याचवेळी तुम्ही भ्रमात राहू नका असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

विधानसभेत अनपेक्षितपणे धक्का बसल्यानंतर आता ठाकरे गटाने महापालिकेवर लक्ष केंद्रीत केल्याचं दिसत आहे. कोणत्याही परिस्थितीत सेनेचा हा गड कायम ठेवण्यासाठी उद्धव ठाकरेंनी कंबर कसल्याचं दिसून येत आहे. त्याचसंबंधी ठाकरे गटाच्या मेळाव्यात उद्धव ठाकरेंनी भाष्य केलं.

सगळ्यांचे म्हणणं आहे की एकटं लढा. तुमच्यात ती ताकद आहे? अजून निवडणूक जाहीर झाली नाही. मला तुमची जिद्द बघू द्या, तुमची तयारी बघू द्या. ज्यावेळी मला दिसेल तुमची तयारी झाली आहे, त्यावेळी कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार निर्णय घेईन, असंही ठाकरे म्हणाले.

## टोरेस कंपनी फसवणूक प्रकरणात ईडीकडून १० ठिकाणी छापेमारी

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईमधील दादर परिसरात टोरेस नावाच्या कंपनीनं कमी कालावधीत पैसे दुप्पट करुन देण्याचं अमिष दाखवत गुंतवणूकदारांची मोठी फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार काही दिवसांपूर्वी उघडकीस आला. या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. आता या फसवणुकीच्या प्रकरणात ईडीने एन्ट्री केली आहे. गुरूवारी ईडीने कारवाई करत मुंबई आणि जयपूरमधील तब्बल १० ठिकाणी छापेमारी केली आहे.

टोरेस कंपनीने तब्बल १००० कोटींची ही फसवणूक केल्याची माहिती सांगितली जाते. यामध्ये एक लाखांहून अधिक गुंतवणूकदारांची फसवणूक झाली आहे. या प्रकरणात कंपनीशी निगडीत असणाऱ्या तिघा जणांना पोलिसांनी अटक केलेलं असून ते कोठडीत आहेत. मुंबई आणि आसपासच्या एक लाखाहून अधिक गुंतवणूकदारांना आकर्षक परतावा देण्याचं आश्वासन या टोरेस कंपनीने दिलं होतं. दरम्यान, मुंबई पोलिसांनी दाखल केलेल्या तक्रारीनंतर आता ईडीने या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत या घोटाळ्याचा तपास सुरु करण्यात आला आहे. गुरूवारी अंमलबजावणी संचालनालयाने टोरेस ज्वेलरी फसवणुकीच्या संबंधित मुंबई आणि जयपूरमधील दहा ठिकाणी छापे टाकले आहेत.

## सत्तेच्या खुर्चीला लाथ मारून आपण बाहेर पडणारे लोक –उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई (प्रतिनिधी)–** बाळासाहेबांनी आम्हाला स्वाभिमान शिकवला आहे. बाळासाहेबांच्या विचारांशी आता प्रतारणा होणार नाही. तत्वासाठी सत्तेच्या खुर्चीला लाथ मारून आपण बाहेर पडणारे लोक आहोत. जिनके इरादे बुलंद होते है वही चट्टा नको भी रहते है, जो तुफानो मे पलते है वही दुनिया बदलते है, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.



स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त गुरूवारी बीकेसी येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा मेळावा पार पडला आहे. बाळासाहेब ठाकरेंच्या जयंतदिनी आपण विजयोत्सव साजरा करत आहोत, यावेळी ते बोलत होते. तर बाळासाहेबांचा विचार आपण जीवपाड जपला म्हणूनच आपल्याला निवडणुकीत विजय मिळवता आला आहे, असेही एकनाथ शिंदेंनी नमूद केले.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, विधानसभा निवडणुकीत आपण ऐतिहासिक विजय मिळवला आहे. आपण आज विजयोत्सव साजरा करत आहोत. पुढच्या अनेक पिढ्या या विजयाची आठवण ठेवल्याशिवाय राहणार नाही. हे यश बाळासाहेबांच्या विचाराचं आणि महायुतीच्या एकजुटीचं आहे. लाडक्या बहिणींचं, लाडक्या भावांचं लाडक्या शेतकऱ्यांचं लाडक्या तरुणांचं हे यश आहे. गरीब शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री होऊ शकला, याची मला जाणीव आहे. तर मुख्यमंत्र्यांनी माझ्या आगोदर कोणीतरी भाषण करेल असं वाटलं होतं. पण एकट्याला बॅटिंग करायला ठेवलं. असेही मिश्कील विधान उपमुख्यमंत्र्यांनी केले आहे.

आताचा हा ऐतिहासिक विजय आहे आता जबाबदारी वाढलेली आहे. आता दुप्पट वेगाने नाहीतर चौपट काम करावे लागेल. शिवसेनेचा विचारांबरोबर तडजोड होणार नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

## प्रजासत्ताक दिनी पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ध्वजवंदन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त रविवार, दि. २६ जानेवारी २०२५ रोजी नांदेड वजिराबाद परिसरातील पोलीस मुख्यालय पोलीस कवायत मैदान येथे सकाळी ९.१५ वा. राष्ट्रध्वज वंदन व संचलनाचा मुख्य शासकीय समारंभ होणार आहे. हे राष्ट्रध्वज वंदन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दूग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमासाठी सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोषाखात समारंभ सुरु होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने सोबत कोणतेही बॅग किंवा तत्सम वस्तू आणू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी ८.३० वाजेपूर्वी किंवा १० वाजेनंतर आयोजित करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, प्रजासत्ताक दिनानिमित्ताने विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वजसंहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. गृहविभागाच्या राष्ट्रध्वजाच्या उचित सन्मानाबाबतच्या परिपत्रकात नमूद केलेल्या निर्देशनानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही याची दक्षता संबंधितांनी घ्यावी, असेही आवाहनही राष्ट्रध्वज वापराबाबतच्या जिल्हास्तरीय जनजागरण समितीने केले आहे.

## कुंडलवाडी ठाण्याचे दोन पोलीस अधिकारी लाचेच्या जाळ्यात

### एपीआय नागरगोजे आणि पीएसआय शिंदेंचा समावेश

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** शासकीय परवानगीने वाळू वाहतूक करणाऱ्या ठेकेदाराकडून २५ हजार रुपये लाचेची मागणी करून १७ हजार रुपये लाच दोन पोलीस अधिकाऱ्यांनी स्वीकारली. याप्रकरणी कुंडलवाडी ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक नागरगोजे व पोलीस उपनिरिक्षक शिंदे हे दोघे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात गुरुवार, दि. २३ जानेवारी रोजी अडकले. या कारवाईमुळे जिल्हा पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

तक्रारदार यांच्याकडे एक हायवा वाहन असून ते या वाहनाने कायदेशीर परवानगी असलेल्या वाळूच्या ठेक्यावरून ऑर्डर मिळाल्याप्रमाणे वाळू वाहतूक करतात. त्यांचा वाळू वाहतुकीचा हायवा पोलीस स्टेशन कुंडलवाडीचे हद्दीतून वाळू वाहतूक करताना त्यावर पोलिसांनी कोणतेही कारवाई करू नये, या करिता पोलीस उपनिरीक्षक नारायण शिंदे यांनी पडताळणी दरम्यान स्वतः साठी १० हजार रुपये व सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांच्यासाठी १५ हजार रुपये लाचेची मागणी केली.



त्यानंतर पडताळणी दरम्यान तडजोडीअंती पोलीस उपनिरीक्षक शिंदे यांनी स्वतःसाठी ७ हजार रुपये व सहायक पोलीस निरीक्षक नागरगोजे यांच्यासाठी १० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. तसेच नागरगोजे यांनी पडताळणी दरम्यान सदरची लाच रक्कम शिंदे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे शिंदे याने १७ हजार रुपये लाच रक्कम पंचांसमक्ष पोलीस ठाण्यात स्वीकारली. याप्रकरणात दोन्हीं लाचखोरांना ताब्यात घेण्यात आले असून पोलीस ठाणे कुंडलवाडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक संदीप पालवे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संजय तुंगार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक प्रशांत पवार, पोलीस निरीक्षक प्रिती जाधव, अंमलदार राजेश राठोड, बालाजी मेकाले, ईश्वर जाधव यांचा समावेश होता.

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे नांदेडमध्ये स्वागत

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी गुरुवार, दि. २३ जानेवारी रोजी परभणी येथील कृषी विद्यापीठातील दीक्षांत समारंभ कार्यक्रमासाठी नांदेड विमानतळावर आले. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे सकाळी ११ वाजता त्यांच्या परभणीच्या नियोजित दौऱ्यासाठी नांदेड येथील श्री गुरु गोविंदसिंघ विमानतळावर आगमन झाले होते. यावेळी श्री गुरु गोविंदसिंघजी नांदेड विमानतळावर स्वागत करण्यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, आमदार डॉ. तुषार राठोड, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव उपस्थित होते.



राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचा परभणी येथील दीक्षांत समारंभ कार्यक्रम आटोपून त्यांनी नांदेड विमानतळावर मुंबईकडे रवाना झाले आहेत.

## आ. चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली शिवराज पाटील होटाळकरांसह अनेकांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा- कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर यांच्यासह नायगाव विधानसभा मतदारसंघातील शेकडो कार्यकर्त्यांनी गुरूवारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत मुंबईत पार पडला.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष जीवन पाटील घोगरे, माजी सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर, माजी जिल्हा परिषद सदस्य विनायकराव पाटील मांजरमकर, मारोती वाडेकर, माधव पावडे, धर्माबाद कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोक पाटील वडजे, शिवराज पाटील गाडीवान, संजय पाटील शिंदे, गंगाजी पाटील मुगावकर, सटवाची मोदलवाड, श्रीपत पाटील शिंदे, माधव पाटील उपासे, शिवाजी पाटील पवार, बापूराव पाटील पवार, चंद्रकांत पाटील पवार, गणेश पाटील पवार, मनोहर पाटील हिवराळे, बालाजी पाटील, विलास पाटील धुपेकर, दत्तात्रय पाटील होटाळकर, भाऊराव पाटील पवार, देवराज पाटील पवार, गुरुराज पाटील पवार, चंद्रकांत पाटील पवार, जेजेराव पाटील पवार, राजू पाटील बावणे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत शिवराज पाटील होटाळकर आणि शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत पक्ष प्रवेश झाल्यानंतर पक्ष वाढीसाठी आगामी काळात आपण निश्चितपणे चांगल्या पद्धतीने काम कराल अशी, अपेक्षा व्यक्त करत शिवराज पाटील होटाळकर यांच्यासह पक्षात प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांना अजितदादा पवार यांनी शुभेच्छा दिल्या.

## उद्या काँग्रेसचे निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभाराविरोधात आंदोलन

### जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन घेणार पत्रकार परिषद

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून शनिवार, दि.२५ रोजी राज्यभरासह नांदेड येथे काँग्रेसकडून निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभाराविरोधात निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. खा. प्रा. रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन दुपारी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभारावर भाष्य करण्यात येणार आहे, अशी माहिती नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र संस्था असून भारतीय राज्यघटनेने स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणूका घेण्यासाठी या संस्थेची स्थापना केली. परंतु मागील काही वर्षांतील निवडणूक आयोगाची भूमिका पक्षपाती दिसत आहे. २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस असून या दिनाचे औचित्य साधून राज्यभर काँग्रेस पक्षाच्यावतीने निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभाराविरोधात निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. दरम्यान २५ जानेवारी रोजी नांदेड जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्यावतीने निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभाराचा निषेध करण्यात येणार आहे. खा. प्रा. रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्यानंतर काँग्रेस कार्यालय नवा मोंढा येथे दुपारी २.३० वाजता पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभारावर भाष्य करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने पक्षपातीपणा न करता निष्पक्ष व पारदर्शक निवडणूका घेण्याचे कर्तव्य पार पाडावे. तसेच लोकशाहीचे रक्षण व मतदारांचा आदर, सन्मान तसेच विश्वास कायम ठेवून विश्वासर्हता अबाधित राहिल याकडे निवडणूक आयोगाने लक्ष द्यावे, अशी काँग्रेसची भूमिका आहे. आंदोलनात काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी केले आहे.




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# इच्छामरण : योग्य की अयोग्य?

महाभारतामध्ये पितामह भीष्म यांना इच्छामरणाचे वरदान प्राप्त झाले होते, म्हणून ते दक्षिणायनामध्ये धारातीर्थी पडून सुद्धा त्यांनी उत्तरायनामध्ये आपला प्राण सोडला होता. आधुनिक काळामध्ये देखील ही संकल्पना थोड्या वेगळ्या प्रमाणात येते आहे. अलीकडेच जगभरात दयामरण आणि इच्छामरणाच्या संकल्पना जोरदारपणे चर्चेत आल्या आहेत. मरणासन्न अवस्थेतील रुग्णांना असह्य वेदनांतून मुक्त करण्यासाठी किंवा दीर्घकालीन आजारांमुळे आयुष्य निरर्थक वाटत असल्यास, त्यांच्या मरणास अनुमती देणारे कायदे काही देशांत मंजूर होत आहेत. याच पार्श्वभूमीवर ब्रिटनच्या संसदेत 'दयामरण विधेयक' प्राथमिक टप्प्यात मंजूर झाले आहे. पण हा विषय फक्त वैद्यकीय किंवा कायदेशीर मर्यादित नसून, त्याचे गंभीर नैतिक, धार्मिक, आणि सामाजिक पैलू आहेत. दयामरण ही संज्ञा वैद्यकीय दृष्टिकोनातून गंभीर, असाध्य आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना दिल्या जाणाऱ्या दयाळू मृत्यूशी निगडित आहे. अशा स्थितीत, रुग्णाला प्राणघातक औषध दिले जाते, ज्यामुळे त्याच्या वेदनांना पूर्णविराम मिळतो. यामध्ये मुख्यतः वैद्यकीय व्यावसायिकांची भूमिका असते. दयामरण आणि इच्छामरण यामध्ये महत्त्वाचा फरक आहे. इच्छा-मरणात रुग्ण स्वतःहून मरण्याचा निर्णय घेतो आणि त्यासाठी आवश्यक ती कृती करतो. दयामरणात, रुग्ण स्वतः मरू शकत नसल्यामुळे, त्याच्या सहमतीने किंवा कुटुंबियांच्या संमतीने डॉक्टरांच्या सहाय्याने मृत्यू दिला जातो. ब्रिटन-मधील 'दयामरण विधेयक' काही विशिष्ट निकषांवर आधारित आहे. १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या अशा रुग्णांसाठी हा कायदा लागू होईल, जे सहा महिन्यांच्या आत मृत्यूच्या टोकाला पोहोचतील, असे डॉक्टरांचे मत आहे. इंग्लंड आणि वेल्समध्ये लागू होणारा हा कायदा स्कॉटलंड आणि उत्तर आयर्लंडमध्ये मात्र लागू होणार नाही. या कायद्यामुळे रुग्णाला सन्मानाने मृत्यू स्वीकारण्याचा अधिकार मिळणार आहे. दयामरणाला कायदेशीर मान्यता देणाऱ्या देशांमध्ये नेदरलँड्स हा अग्रस्थानी आहे. नेदरलँड्सने इच्छामरणासही कायदेशीर मान्यता दिली आहे. बेल्जियम, लक्झेंबर्ग, स्पेन आणि अमेरिकेतील ११ राज्यांमध्येही यास मान्यता आहे. कॅनडामध्ये 'मेडिकल असिस्टन्स इन डाईंग' या नावाने इच्छामरण कायदेशीर आहे. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसारख्या देशांमध्येही दयामरणाच्या प्रक्रियेला परवानगी आहे. भारतामध्ये दयामरण किंवा इच्छामरणाचा विषय फारसा चर्चेत नाही. अरुणा शानबाग प्रकरण हे याचे प्रमुख उदाहरण आहे. बलात्कारानंतर अनेक दशके अंथरुणाला खिळून राहिलेल्या अरुणासाठी इच्छामरणाची मागणी करण्यात आली होती, मात्र सुप्रीम कोर्टाने ही याचिका फेटाळली. त्यानंतर भारतात इच्छामरणाचा मुद्दा काहीसा थंडावला. मात्र, २०१८ मध्ये सुप्रीम कोर्टाने काही विशिष्ट परिस्थितीत 'पॅसिव्ह इच्छामरणाला' मान्यता दिली. यामुळे अत्यवस्थ रुग्णांसाठी एक मार्ग तयार झाला, पण तरीही दयामरणाला भारतात मान्यता नाही. दयामरणाच्या कायद्याला नैतिक आणि धार्मिक विरोध मोठ्या प्रमाणावर होत आहे. माणसाचा जीव घेण्याचा अधिकार निसर्गालाच आहे, असा धार्मिक तत्त्वज्ञानांचा दावा आहे. मानवी हत्या आणि दयामरण यामध्ये स्पष्ट फरक करण्याची गरज आहे. तसेच दयामरणाचा निर्णय घेताना रुग्णाचा संमतीचा निकष कसा तपासला जाईल, हे मोठे आव्हान आहे. काही प्रकरणांमध्ये आर्थिक कारणे, मानसिक दबाव किंवा इतर वैयक्तिक समस्या रुग्णाचा निर्णय प्रभावित करू शकतात. दयामरण हा निर्णय केवळ रुग्णाच्या आयुष्याचा नसून, त्याच्या कुटुंबियांवरही मोठा परिणाम करणारा असतो. त्यामुळे कुटुंबियांच्या सहमतीची गरज असते. वैद्यकीय दृष्टिकोनातून, या प्रक्रियेत डॉक्टरांना सहभागी होण्यास भाग पाडणे काही वेळा त्यांच्या नैतिकतेशी संघर्ष निर्माण करू शकते. यामुळे दयामरणाचा कायदा करताना त्याच्या व्यावहारिक परिणामांचा विचार करणे अत्यावश्यक आहे. दयामरण हा विषय केवळ कायद्यापुरता मर्यादित नाही. तो माणसाच्या मूलभूत हक्कांशी, सामाजिक नीतिमूल्यांशी, आणि वैद्यकीय व्यवस्थेशी निगडित आहे. दयामरणाच्या कायद्याला मान्यता देताना, रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण, डॉक्टरांची नैतिकता, आणि समाजातील सहिष्णुता यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. दयामरण हा विषय जितका भावनिक तितकाच गुंतागुंतीचा आहे. रुग्णांच्या वेदनांना अंतिम विराम देण्यासाठी केलेली ही प्रक्रिया मानवीयतेच्या दृष्टिकोनातून योग्य वाटू शकते. मात्र, तिचा गैरवापर टाळण्यासाठी कठोर तरतुदींची गरज आहे. दयामरणाचा कायदा हा नैतिक आणि वैद्यकीयदृष्ट्या जबाबदारपणे हाताळण्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्याबाबत व्यापक चर्चा होणे गरजेचे आहे, ज्यामुळे रुग्णांच्या वेदनांना सन्मानाने शेवट मिळेल, पण कोणाच्याही भावनांचा अनादर होणार नाही.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा



मराठी भाषेतून ललित साहित्या बरोबर इतर उत्कृष्ट माहितीपर लेखन व्हावे, भाषेचे उपयोजन वाढले की आपोआप भाषा टिकते. मातृभाषा ही त्यामुळे सर्वश्रेष्ठ भाषा आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याम ुळे मराठी भाषेची थोरवी आणखी वाढली आहे. मातृभाषा ही गरज वाटली पाहिजे. तेव्हाच आपण प्रभावीपणे व्यक्त होतो.मराठी शिवाय माझे काही अडत नाही हे बोलणे संयुक्तिक व चांगले वाटत नाही हे बोलणे म्हणजे मराठी भाषेच्या मुळावर उठणे असा त्याचा अर्थ होईल *नुकताच केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. यापूर्वी मराठी भाषिकांनी ही मराठी लोकभाषा,बहुजनाची भाषा, होण्यासाठी अनेक प्रयत्न राज्यस्तरावर केले आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये सर्वांनी आपण एकजुटीने प्रयत्न केला,तसाच प्रयत्न आता आपणास करावयाचा आहे. हा मुख्य प्रश्न या पंधरवड्याच्या निमित्ताने आपण या ठिकाणी घेतलेला आहे. त्यासाठी काही उपाय योजनांचा,उपक्रमाचा,तसेच विचारांचे आद-ान-प्रदान व्हावे.यासाठी हा लेखन प्रपंच...*. मराठी भाषा साहित्य संस्कृती वाढविण्यासाठी आपणास विद्यार्थ्यांच्या,बालकांच्या मनावर चांगले संस्कार करावे लागतील. मराठीची गोडी वाढवण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना कराव्या लागतील. जनजागृती करण्यासाठी समाजात एकांकिका, नाटिका,

कथाकथन अशा वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करावे लागेल. मराठी भाषा साहित्य संस्कृती वाढवण्यासाठी व्याख्यानमालेचे पुष्प गुंफिता येतील. घरात, विद्यालयात, सम ारंभात सर्वत्र अस्खलित मराठी भाषा बोलून मराठीची गोडी वाढविता येईल.अनेक मराठी दैनिक वर्तमानपत्राचे वाचन करून आपण मराठी भाषा अधिकाधिक दृढ करू शकतो. समाजातील भाषिक, साहित्यिक यांची म ानसिक दृष्ट्या सुदृढता वाढविण्यासाठी प्रसार माध्यमाचा उपयोग आपणाला करून घेता येईल. उद्याच्या मराठी भाषा बोलणा-या समाजाची अभिरुची वाढविण्यासाठी आपण मराठी भाषेला लोकाश्रय मिळवून दिला पाहिजे.लहान मुले,युवक-युवती यांच्यावर मराठी वाचनाचे संस्कार जाणीवपूर्वक घडून आणले पाहिजेत. त्यामुळे अभिरुची संपन्न समाज,संस्कारी जीवन जगेल यात शंका नाही. प्रगल्भ वाचकांचा समाज मातृभाषा म राठीला निश्चितच आपलंसं करेल,यासाठी दर्जे दार साहित्याच्या वितरणाचे आपणाला आज गरज निर्माण झाली आहे. सकस,सकारात्मक लिहिणाऱ्या लेखणीला बळ द्यावे.मराठी भाषेतील अनेक ग्रंथालये अद्यावत करावीत. मराठीतून संवाद कौशल्य क्षमता, वाचन क्षमता विकसित होण्यासाठी तालुका स्तरावर मेळावे भरवावेत.सर्व शासकीय कार्यालयात मराठी भाषा बोलण्याची सक्ती करावी. शिक्षकाने आवर्जून मराठी भाषेतून वेगवेगळे उपक्रम घेऊन मराठी भाषेला समृद्ध करावे या गोष्टी केल्यानंतर आपण मराठी भाषेचे समाजातील अनन्य साधारण महत्व सांगू शकतो.

कीर्तन महोत्सव, जागरण, गोंधळ, भारुडे, उत्कृष्ट समाजपयोगी मालिका, समाजप्रबोधनपर चित्रपट, दर्जेदार ग्रंथ वेगवेगळ्या लोककला यांच्या माध्यमातून सुद्धा आपण मराठी भाषेची गोडवी वाढवू शकतो त्यासाठी आपण सातारा जिल्ह्यातील भिलार या गावाची माहिती घेऊ- महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेने पुस्तकांचे गाव म्हणून सातारा जिल्ह्यातील भिलार या गावाची निवड केली.

या ठिकाणी चालणारे कार्य सर्वासाठी अतिशय प्रेरणादायी आहे. वाचन प्रेरणा दिन १५ ऑक्टो, मराठी भाषा गौरव दिन, २७ फेब्रु, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा,१५ जाने ते ३० जानेवारी या दिवसांचे औचित्य साधून अनेक कार्यक्रम भिलार या ठिकाणी अतिशय उत्साहाने घेतले जातात.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील विविध नामांकित लेखक, दिग्दर्शक, नाट्य कलाकार,संगीतकार नाट्य लेखक, गीतकार, चित्रपट कलावंत, सामाजिक चळवळीत काम करणारे कार्यकर्ते, लेखक, साहित्यिक, कवी अशा दिग्गजांची मांदियाळी येथे पाहायला मिळते. कवयित्री संजीवनी मराठे यांच्या माय मराठी! तुझ्या पायी तन मन धन मी वाहियले, तुझिया नामी, तुझिया धामी अखंड रंगूनि राहियले, या कवितेची प्रचिती भिलार या ठिकाणी गेल्यानंतर आपल्याला मिळाल्याशिवाय राहणार नाही.

मराठी भाषेचे संवर्धन करणारे गाव भिलार,वाचन संस्कृतीचे ऊर्जा स्रोत भिलार, बुके नको बुक द्या,ही नवीन प्रथा येथे सुरू झाली.येथे अनेक स्त्री-पुरुष आवर्जून पुस्तक वाचण्या साठी वेगवेगळ्या ठिकाणाहून येतात.भारतातील पहिले पुस्तकांचे गाव भिलार,महाराष्ट्राचा वाचन प्रकल्प या अंतर्गत वाचन संस्कृती वाढवावी, वाचन चळवळ, वाचन प्रेरणा जागृती व्हावी,यासाठी महाराष्ट्राचा विकास करावयाचा असेल तर मराठी भाषेचा विकास झालाच पाहिजे. या अनुषंगाने भारतातील पहिले पुस्तकाचे गाव म्हणून भिलार हे गाव नावारूपाला आलेले आहे. महाराष्ट्र शासन आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्यातून या प्रकल्पाला सात वर्षे पूर्ण होत आहेत. या ठिकाणी कोणी यावे वाचावे, पुस्तक हाताळावीत, असा उपक्रम गावकऱ्यांनी करून दिलेला आहे. निसर्गरम्य वातावरणात नैसर्गिक फुले, फळामुळे वनस्पती मानवी मनाला मोहिनी घालतात. स्ट्रॅबेरी मुळे वातावरणात आणखी आनंद निर्माण होतो. मराठी भाषा ज्ञानार्जनाची शिदोरी दरवर्षी १५ जानेवारी ते ३० जानेवारी हा मराठी भाषा पंधरवडा सर्वत्र मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.पेपर मध्ये व्हाट्सअप वर व अनेक ठिकाणी फक्त दोन आठवडे मराठी भाषेचा उदो उदो करून चालणार नाही.सर्वच विद्यार्थ्यांनी मराठी भाषा शिकावी, त्यासाठी शासनाने ती अनिवार्य करावी.मराठी भाषेमध्ये मराठी साहित्याचा खजिना आहे.याकडे दुर्लक्ष करू नये.मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येकानी कंबर कसून कामाला लागावे. कारण मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी या भाषेवर अनेक इतर भाषेचा दबाव पडता कामा नये. आपली मराठी भाषा अनेक भाषाना घेऊन चालते. तरीही मराठी भाषेची दयनीय अवस्था का निर्माण झाली हे सर्वांनी आत्मचिंतन करावे. मराठी शाळेमध्ये विद्यार्थी येण्या ऐवजी इंग्रजी शाळेत का जात आहेत? मराठी सरकारी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.एवढी गळती का झाली ? याचा विचार व्हावा. आपली पटसंख्या कमी होण्याची कारणे काय आहेत? याचे ही विचार मंथन होणे गरजेचे आहे. मराठी शाळेवर कमी पटसंख्या मुळे नामूष्की ओढवण्याची वेळ सध्या दिसत आहे. आजतागायत ही परिस्थिती कमी होती. परंतु आता तिच्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. प्रत्येक आई-वडिलांना आपला मुलगा इंग्रजी शाळेत शिकावा असे वाटत आहे.कारण ती जगण्याची भाषा झाली आहे. बाहेर इंग्रजी भाषेचा डांगोरा पिटला जात आहे. त्यासाठी सर्व पालकांनी मराठी भाषेचा आग्रह धरावा. याचा अर्थ इंग्रजी भाषा शिकू नये असा अजिबात नाही. दुसऱ्याचे मूल कडेवर घेऊन आपले मूल आपण चालवीत नेत आहोत. अशी अवस्था मराठी भाषेची झाली आहे. म्हणून या पंधरवड्याच्या निमि त्ताने सर्वांनी मराठी भाषेकडे दुर्लक्ष न करता मराठी साहित्य संमेलनाना मधून मराठी भाषेचा विकास कसा करता येईल याकडे लक्ष वेधून घेतले तर बरेच व भले होईल.

साहित्यिक, प्रकाशक, मित्र, लेखक, वाचक हे एकत्रित येऊन वेगवेगळ्या खेडोपाडी ग्रामीण भागात मराठी साहित्य संमेलन भरवावेत.त्या ठिकाणी मराठी भाषे-चीच चर्चा व्हावी, आजूबाजूला असणाऱ्या घटक राज्यांनी मराठी भाषेवर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. असे जर होत असेल तर एक दिवस मराठी भाषा नामशेष होईल. मराठी साहित्याची ओळख व्हावी, मराठी साहित्या विषयी वाचकाचे प्रेम वाढावे म्हणून महाराष्ट्र तील नामवंत साहित्यिकांनी, विचारवंतांनी, कवी लेखक, कथाकार ,व्याख्याते यांचे दर्जेदार साहित्य उपलब्ध करून द्यावे. संमेलनाच्या माध्यम ातून मराठी भाषेतील संस्कारक्षम पुस्तके अल्प दरात वाचकांना, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावेत. ना नफा, ना तोटा या तत्त्वावर सुद्धा मराठी भाषेची पुस्तके विक्रीला ठेवता येतात.बालकुमार साहित्य उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून मराठी भाषेची थोरवी गाता येईल असे केल्यास आपण मराठी भाषेला पुढे घेऊन जाऊ शकतो. मराठी भाषा साहित्याच्या वाचना बरोबर विद्यार्थ्यांनी दैनंदिन वृत्तपत्रे, मासिके, पाक्षिके, दिवाळी अंक, वार्षिक अंक याचेही वाचन करावे. या वाचनातून चालू घडामोडी वरील परिपूर्ण अभ्यास होतो. प्रशासकीय कामकाजात कार्यालयीन मराठी भाषेचे फार महत्त्व आहे. संपूर्ण कारभार पत्र व्यवहार मराठी भाषेतून होत असल्यामुळे व्यवहारिक मराठीचा अभ्यासक्रम सर्वांना देणे गरजेचे आहे. सर्व न्यायालयात मराठी भाषेतून कामकाज चालावे, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी कला शाखेत प्रवेश घेऊन आपले भवितव्य घडवावे.

लीळाचरित्र, भावार्थदीपिका, रामायण, महाभारत, तुकाराम गाथा, चांगदेव पासष्टी, संत चोखोबा ते तुकोबा पर्यंतच्या संताच्या साहित्यातील अवीट गोडी निर्माण करून मराठी भाषेचे जतन व संवर्धनासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी
ता. मुखेड, जि. नांदेड

# डॉ. होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगितले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले.



१९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निम ाण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली.

अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जे चा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# 'थांबला तो संपला'

जो सतत कार्यरत राहातो तो यशस्वी झाल्याशिवाय राहात नाही. कोणताही मार्ग, मार्ग क्रमन करण्यासाठी सुकर, किंवा आपल्या सोयीचा असतो असे मुळीच नसते. कोठे खाच खळगे असतात, कोठे पहाडी भाग असतो, कोठे काटेही पसरलेले असतात, तर कोठे-कोठे फुले सुद्धा पसरलेली असतात, कोठे अंधार पसरलेला असतो, कोठे भितीदायक स्थिती असू शकते. या व अशा अनेक अडचणींनी युक्त रस्ते किंवा मार्ग आपल्या सम ोर येत असतात. आपण या समस्यांना घाबरून, त्यांचाच विचार करत एकाच ठिकाणी थांबलो तर,आपण कसे यशस्वी होणार?

यशस्वीतेसाठी आपल्याला कोणतातरी मार्ग निवडावाच लागेल. कदाचित,काही वेळा प्रथम निवडलेल्या मार्गावर आपल्याला यश मि ळणारही नाही, तर मग आपण तिथेच थांबायचे का? थांबून काय होणार? काहीच होणार नाही, आपण ज्या स्थितीत आहोत त्याच स्थितीत राहणार. म्हणूनच आपल्या पूर्वजांनी म्हटले आहे की, थांबला तो संपला.

मनुष्य जीवनात,आपल्याला काही तरी विशेष कार्य केल्याशिवाय जीवनाचे सार्थक कसे होणार? तसे इतर प्राणीही जीवन जगतातच पण, मनुष्य हा एक विशेष प्राणी आहे. त्याला जीवनात काहीतरी केल्याशिवाय संपायचे नाही. जीवनामध्ये आपले एक निश्चित ध्येय असावे, आणि ते साध्य झाल्याशिवाय स्तब्ध बसणार नाही अशी भूमिका पाहिजे. आप-ले ध्येय साधण्यासाठी सतत कार्यरत राहाणे गरजेचे असते.

या संदर्भात मला एक कथा आठवते. ती म्हणजे सशाची आणि कासवाची. त्या कथेमध्ये धावण्याच्या शर्यतीत, कासवाची जीत होते आणि सशाची हार होते. डोळस पणे पाहिले तर आजच्या युगात हे खरे वाटते का? बिल्कुलच नाही. कारण आज आपण, आजच्या उपलब्ध साधन सामुग्रीचा किंवा परिस्थितीचा विचार करून ते ठरवून टाकतो. परंतु ते त्या वेळी शक्य झालेही असेल. पण आपण त्या बाबीच्या खोलात न जाता वरवर विचार करू. कथेमधील ससा काही वेळ सुसाट धावतो आणि पुढे जाऊन, कासव दिसत नाही म्हणून आराम करायला लागतो. त्याच कालावधीत कासवाचे सतत चालण्याचे प्रयत्न सुरूच असतात. तो सशाचा विचार करत नाही, तर पुढे पुढे चालत राहण्याचाच ध्यास घेतो. काही अवधी नंतर तो त्याच्या इच्छित स्थळी पाहोचतो, पहातो तर ससा अद्याप पोहोचलेला नाही. कारण की ससा इकडे मध्येच कोठेतरी आराम करत होता. अशा प्रकारे कासवाने ही स्पर्धा जिंकली होती.

ही कथा तर मानवी जीवनावरच आधारित आहे.या मध्ये कासव आणि ससा हे , मानवी स्वभावाचे प्रतिके म्हणून योजलेले असावेत. आपल्या समाजात अशा स्वभावाच्या बऱ्याच व्यक्ती असतात. माझा हेतू कुणाला दोष देण्याचा मुळीच नाही. तर या बाबींचा सर्वांनी निष्पक्षपणे विचार करावा ही अपेक्षा. मानसाची वृत्ती कासवासारखी असावी. सतत प्रयत्नशील किंवा कार्यमग्न असावे. आपल्या कार्यात किंवा आपल्या मार्गावर कितीही अडचणी आल्या तरी, आपल्या ध्येयापासून विचलित होऊ नये. तेव्हाच आपण आपले इच्छित ध्येय गाठू शकतो, अन्यथा आपण कथेतल्या सशास-ारखे तेथेच बसून राहतो आणि त्याचा फायदा दुसऱ्यास होतो.

या भूतलावर अनेक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष , संशोधक होऊन गेले आहेत. ते एका क्षणात घडले नसावेत. त्यांना खूप साधना करावी लागली. त्यांच्या साधनेमध्ये त्यांना पदोपदी डोंगराएवढ्या अडचणी येत होत्या. त्या अडचणीचा डोंगर पाहून ते आपल्या ध्येयापासून तस्सूभरही विचलीत झाले नाहीत. तर मोठ्या धैर्याने सामना करून आपल्या ध्येयापर्यंत पोहोचले. आपल्या संतांचा विचार केला तर, त्यांनाही खूप लोकप्रमाद सहन करावा लागला. संतांच्या प्रमाणेच समाजसुधारकांनाही समाजातूनच खूप विरोध झाला, तर काहींचा समाजाकडून छळ सुद्धा करण्यात आला पण त्यांनी आपली तपश्चर्या खंडित केली नाही. विरोधाला घाबरून चूप बसले नाहीत तर न डगमगता आपल्या ध्येयापर्यंत पोहोचले. जेव्हा त्यांनी,त्यांचे निश्चित ध्येय गाठले तेव्हा आम्ही सर्वसामान्यांनी ,तर त्यांना अक्षरशः डोक्यावरच घेतलेले आहे. थोडक्यात आपण त्यांना देव मानायला लागतो.

म्हणतात ना! की, 'टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण सुद्धा मिळत नाही.' या म्हणीनुसार देवाला सुद्धा त्रास सहन केल्याशिवाय देवपण मिळत नाही. तर आपल्या सारख्या सामान्य मानसाची काय कथा? आपल्याला म्हणजे सर्वांनाच सतत कार्यरत राहिल्याशिवाय काहीही प्राप्त होणे दुर्लभ आहे. इच्छित ध्येय गाठण्यासाठी सतत कार्यरत राहाणे गरजेचे आहे. हे दर्शविण्यासाठी आपल्या पूर्वजांनी म्हटले आहे की, दैरे हरी पलंगावरी . आपण प्रयत्न न करता आपल्याला तो, हरी ( परमेश्वर) तरी, इच्छित फळ कसा देणार आहे?

**-रामदास राजेगांवकर**
मेहकर. जि. बुलडाणा
मो. ९४२०२३३०३२.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्या विविध कंपन्यांच्या भेटी

**दावोस :** दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकोनॉमिक फोरम) पहिल्या दिवशी महाराष्ट्राने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ६,२५,४५७ कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले आहेत. एकाच दिवशी इतक्या मोठ्या रकमेचे करार होणे, हा एक नवा विक्रम आहे. दरम्यान आज दुसऱ्या दिवशी सुद्धा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करार होणार आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सामंजस्य करारांच्या व्यतिरिक्त विविध कंपन्यांच्या प्रमुखांच्या भेटी घेतल्या आणि त्यांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी निमंत्रित केले. टाटा समूहा-चे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांचीही काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. टाटा समूह ३० हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे.

काल्सबर्ग समूहाचे सीईओ जेकब अरुप अँडरसन यांची मुख्यमंत्र्यांनी भेट घेतली. काल्सबर्ग समूहाने महाराष्ट्रात गुंतवणुकीची इच्छा प्रदर्शित केली असून, त्यांना संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिले.

रिटेल क्षेत्रात कार्यरत लुलू समूहाचे प्रबंध संचालक एमए युसुफ अली यांचीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट घेतली. त्यांनी नागपुरात गुंतवणूक करण्याची इच्छा प्रदर्शित केली असून, महाराष्ट्रातही त्यांनी विस्तार करण्याची तयारी दर्शविली आहे. याबरोबरच रिन्यू पॉवरचे अध्यक्ष आणि सीईओ सुमंत सिन्हा यांचीही त्यांनी भेट घेतली. बीड जिल्ह्यात १५,००० मेवॉ पाईपलाईन आणि पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत यावेळी चर्चा झाली.

शिंडर इलेक्ट्रीक इंडियाचे प्रबंध संचालक आणि सीईओ दीपक शर्मा यांचीही त्यांनी भेट घेतली. जागतिक बँकेच्या मदतीने राज्यातील आयटीआयच्या सक्षमीकरण कार्यक्रमात तसेच ऊर्जा क्षेत्रात एआयच्या वापराबाबत सहकार्य करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. अहिल्यानगर आणि नाशिक येथे विस्तार करण्याच्या त्यांच्या योजनांचेही सूतोवाच शर्मा यांनी केले.

## थोडक्यात...

### जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी ध्वजारोहणाचा राष्ट्रीय कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील रस्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून, श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, म.गांधी पुतळा ते महावीर चौकापर्यंतच्या परिसरातील मुख्य रोडवर २२ ते २७ जानेवारी पर्यंत उपोषणे, आत्मदहने, धरणे, मोर्चे, रॅली, रास्ता रोको आंदोलने इत्यादी आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

### मिनी ट्रॅक्टर, उपसाधनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी) –** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधनांचा पुरवठा करण्यात येणार आहे. इच्छूक पात्र बचतगटांनी ऑनलाईन अर्ज http://mini.mahasamajkalyan.in या संकेतस्थळावर भरुन त्याची सत्यप्रत १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयात सादर करावी, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णयान्वये ८ मार्च २०१७ रोजी निश्चित करण्यात आल्या आहेत. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

# बेशिस्त वाहतूक, मोकाट जनावरांमुळे राष्ट्रीय महामार्गावर अपघातांमध्ये वाढ

## शहर वाहतूक पोलीस नेमण्याची मागणी



**किनवट (प्रतिनिधी)–** बेशिस्त वाहतूक, मोकाट जनावरे आणि वाहतुकीच्या नियमांचा बोजवारा उडत असल्यामुळेच राष्ट्रीय महामार्गावर दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण वाढत आहेत. इतक्या अपघातांनंतरही किनवट शहरात वाहतूक पोलीस नियुक्त करण्याची गरज प्रशासनाला वाटत नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

इस्लापूर – किनवट व किनवट – माहूर राष्ट्रीय महामार्गावर गेल्या वर्षभरापासून अपघाताची मालिका सुरूच आहे. राष्ट्रीय महामार्गाचे काम सात वर्षानंतरही अपुरेच असताना अपघाताच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढच होत आहे. शहरात वाहतुकीचे कुठलेच नियम नाहीत.अल्पवयीन, अप्रशिक्षित वाहनचालक मनमानेल त्या पद्धतीने वाहने चालवित आहेत. शाळकरी, महाविद्यालयीन विद्यार्थी स्कुटीवर ट्रीपल सीट बसून सुसाट धावत असतात. याप्रकाराकडे पोलिसांचे लक्ष नसते. बुलेटच्या कर्णकर्कश आवाजाला नागरिक वैतागले आहेत.

शहरातील प्रमुख रस्ते अरुंद आहेत. त्यातच मोकाट जनावरे, कुत्र्यांचा वावर, गाढवं, खेच्चरांचा उच्छाद अन् नवचालकाकडून नागमोडी वळणाने वाहने चालविण्याच्या प्रकारामुळे रस्त्यावर वाहने चालविणे अवघड झाले आहे. एका युवकाच्या अशाच नागमोडी पद्धतीच्या चालविण्यामुळे बुधवारी दि.२२ साहेबराव बटूर या निवृत्त विस्तार अधिकाऱ्याचा बळी गेला.अल्पवयीन मुले, मुली वाहने सुसाट पळवित आहेत.

**आरटीओंचेही दुर्लक्ष**

दर महिन्याला कॅम्पनिमित्त किनवट भेटीवर येणाऱ्या आरटीओ अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांच्यावर कारवाई करावी वाटत नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

एकीकडे बेशिस्त दुचाकीचालक तर दुसरीकडे तेलंगणा पासिंगच्या, पासिंग नसलेल्या ऑटोंचाही सुळसुळाट आहे. मनमानेल तिथे ऑटो थांबवायचे, ऑटो सुसाट पळवायचे, असे दररोजचेच प्रकार आहेत. स्थानिक पोलीस औपचारिकता म्हणून नाममात्र दंडात्मक कारवाई करतात. वाहतुकीचा बोजवारा उडत असताना दर रविवारी आठवडी बाजाराच्यादिवशी पोलीस ऑटो, जीपचालकाकडून 'वसुली' करण्यात व्यस्त असतात. जिल्हा होवू पाहणाऱ्या किनवट शहरात एकही वाहतूक पोलीस नसल्याने बेलगामपणे वाहतूक सुरू आहे. बेशिस्त वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी पोलिसांनी कारवाईचा बडगा हाती घेण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# एकलव्य स्कूल प्रवेशासाठी २३ फेब्रुवारीला पूर्व परीक्षा

## ५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार; राज्यात ३,२६९ जागा

**नांदेड (प्रतिनिधी)–** सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्रातील एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलची प्रवेश पूर्व परीक्षा २३ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. या परीक्षेद्वारे इयत्ता सहावीत २ हजार २२० नवीन तर इयत्ता सातवी ते नववीच्या १ हजार ४९ रिक्त जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांना ५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आलेली आहे. इच्छुक व पात्र अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी निर्धारीत मुदतीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी श्रीमती मेघना कावली यांनी केले आहे.

किनवट एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत या प्रवेश स्पर्धा परिक्षा किनवट तालुक्यातील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक (कन्या) आश्रमशाळा बोधडी व एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल सहस्त्रकुंड या परिक्षा केंद्रावर २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत घेण्यात येणार आहे. या स्पर्धा परिक्षेसाठी विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज किनवट प्रकल्प कार्यालय व कार्यालया अंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय, अनुदानीत आश्रम शाळा व एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल सहस्त्रकुंड येथे विनामुल्य प्रवेश अर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

दुर्गम आदिवासी भागातील मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी नाशिक, ठाणे, अमरावती, नागपुर या चार अपरआयुक्त कार्यक्षेत्रांमध्ये महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी (नाशिक) मार्फत सीबीएसई बोर्डाच्या ३७ एकलव्य निवासी शाळा चालविल्या जातात. याठिकाणी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, निवास, भोजन, गणवेश आदी सुविधा उपलब्ध करून दिले जातात. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता सातवी, आठवी, नववीसाठी रिक्त जागांचा अनुशेष भरण्यात येणार आहे. तर प्रत्येक एकलव्य स्कूलमध्ये इयत्ता सहावीसाठी ३० मुले व ३० मुली अशी ६० प्रवेश क्षमता असणार आहे. या सर्व जागांवर प्रवेश पूर्वपरीक्षेद्वारे विद्यार्थ्यांची निश्चिती केली जाणार आहे.

दरम्यान, एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलच्या इयत्ता सहावीच्या २ हजार २२० जागांवर विद्यार्थ्यांना प्रथम प्रवेश हे पूर्वपरीक्षेच्या माध्यमातून दिला जाणार आहे. त्यात मुलांच्या १ हजार ११० तर मुलींच्या १ हजार ११० जागांचा समावेश आहे. इयत्ता सातवीच्या ५३३, आठवीच्या २९८ तर नववीच्या २१८ रिक्त जागा प्रवेश पूर्वपरीक्षेद्वारे भरण्यात येणार आहे. तब्बल १ हजार ६०९ मुलांना तर १ हजार ६६० मुलींना एकलव्य स्कुलमध्ये प्रवेश मिळणार आहे.

# भक्ती लॉन्स येथे नि:शुल्क ७ दिवसीय योग शिबिरास सुरूवात



**नांदेड (प्रतिनिधी) –** पतंजली योगपीठ हरिद्वार अंतर्गत एक वर्षभरापासून चालणाऱ्या मालेगाव रोडवरील भक्ती लॉन्स येथील नित्य योग शाखेच्या वतीने निःशुल्क सात दिवसीय योग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. योगाचार्य नांदेड भूषण सिताराम सोनटक्के यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली दि. २३ जानेवारीपासून सकाळी ५ ते ७ या वेळेत या दरम्यान शिबिराला सुरुवात झाली आहे.

या शिबिरात निवृत्त वैद्यकीय अधिकारी जीवनराव पावडे, वृक्षमित्र फाउंडेशन नांदेडचे अध्यक्ष संतोष मुगटकर, शिवभक्त परायण बालाजी महाराज काकांडीकर, कीर्तनकार ह.भ.प. भास्कर महाराज कामारीकर, योग व नॅचर्रोपॅथी तज्ज्ञ सौ. संध्याताई मठदेवरु, पतंजली जिल्हा संघटक मंत्री हनुमंत ढगे गुरुजी, प्रसिद्ध उद्योजक अनिल शेटकार यांचे योगसाधकांना मार्गदर्शन होणार आहे.

या शिबिरात स्वतःचे, कुटुंब आणि परिवाराचे तसेच मित्रपरिवार यांचे स्वास्थ्य उत्तम ठेवण्यासाठी शहरातील नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन पतंजली नित्ययोग समिती, भक्ती लॉन्सचे अध्यक्ष योगाचार्य सिताराम सोनटक्के, उपाध्यक्ष सदाशिवराव बुटले पाटील, सचिव किरण मुत्तेपवार, सहसचिव बालाजी वारले, कोषाध्यक्ष प्राचार्य दिलीप माने, कार्याध्यक्ष लक्ष्मीकांत रुघे, संघटन प्रमुख इंजि. सुरेश गोजे, प्रसिद्धीप्रमुख मकरंद पांगरकर व नित्ययोग समितीचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य, महिला योग समिती आदींनी केले आहे.

# सुनील जाधव लिखीत 'मेरी चर्चित रचनाएं' या पुस्तकाचे प्रकाशन



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील हिंदी साहित्यिक महाराष्ट्र राज्य साहित्य अकादमी पुरस्कार विजेते डॉ. सुनील जाधव यांच्या 'मेरी चर्चित रचनाएं' या पुस्तकाचे प्रा.डॉ. दिलीप चव्हाण, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे, समीक्षक रमा नवले, प्राचार्य रावसाहेब जाधव, महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमीचे सदस्य प्रो.सतीश यादव, 'मिळून साऱ्याजणी' ची संपादिका गीताली, हिन्दी साहित्यकार सुधा आरोढा आदींच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

या पुस्तकात महिला, भटक्या, तृतीयपंथी, मुले, वृद्ध, तरुण, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार, सामाजिक व कौटुंबिक समस्यांवर भर देण्यात आला आहे. सुनील जाधव यांची आतापर्यंत सुमारे २४ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. कविता, कथा, एकांकी नाटक, व्यंग्य, नाटक, अनुवाद, संपादकीय, समीक्षा अशा हिंदी साहित्यातील विविध प्रकारांत त्यांनी लेखन केले आहे.

प्रा.उमा देशमुख यांनी लेखकाचा परिचय करून दिला. डॉ.जयराम सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात 'मेरी चर्चित रचनाएं' च्या संदर्भाची माहिती दिली. नांदेड येथील हिंदी साहित्यातील विविध प्रकारांवर लिहिलेल्या या पुस्तकाबद्दल नांदेड विद्यापीठाचे दिलीप चव्हाण यांनी आनंद व्यक्त केला. मराठवाड्यासारख्या मागास भागातील नांदेड शहरात कविता, कथा, एकांकिका, व्यंग्य, नाटक इत्यादी विविध प्रकारात लिहिल्या जातात, ही आमच्यासाठी अत्यंत सन्मानाची बाब आहे. प्रसिद्ध हिंदी समीक्षक रमा नवले यांनी युवा साहित्यिक म्हणून संबोधताना त्यांच्या सर्जनशीलतेच्या गुणवत्तेबद्दल त्यांचे अभिनंदन केले आणि साहित्य व समीक्षेचे नवे रोप पुढे नेण्यासाठी जबाबदारीचा संदेश दिला.

यावेळी डॉ. संदीप पाईकराव, डॉ. साईनाथ शाहू, विजयसिंह ठाकुर, डॉ. रंजीत जाधव, डॉ.कुलकर्णी, मराठी साहित्यकार जगदीश कदम, शंकर विभूते, उप प्राचार्य अरुणा शुक्ल, डॉ.रेणुका मोरे, डॉ.संदीप पाइकराव, डॉ.साइनाथ शाहू, डॉ.संतोष येरावार, डॉ.लक्ष्मण काले, डॉ. प्रकाश शिंदे, डॉ.भगवान कदम, डॉ.वर्षा मोर, डॉ.रमेश कुरे, डॉ.मरोती लूटे, डॉ. शहनाज, डॉ.रजिया, डॉ.जलालोद्दीन पठान, डॉ.जहिरोद्दीन पठान, डॉ.काझी, डॉ.संतोष, डॉ.राठोड, सुनील अनंतवार यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# लिटिल स्कॉलर्स व अक्षरा फ्री स्कूलमध्ये क्रीडा उत्सव




**नांदेड (प्रतिनिधी) –** शहरातील लिटिल स्कॉलर्स अक्षरा व प्री स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. त्यानंतर आयोजीत गौरव सोहळ्यात स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला होता.

या सोहळ्यासाठी ज्येष्ठ लेखक डॉ.विलास ढवळे, संस्थेचे संचालक रवींद्र रेड्डी आणि सदानंद खिल्लारे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. वर्ग नर्सरी ते युकेजीसाठी धावणे, संगीत खुर्ची, फ्रॉग जंप, पिकप द ऑब्जेक्ट तर पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी कबड्डी, खोखो, रस्सीखेच, सॅकरेस, बुक बॅलन्स, थ्री लेग रनिंगअशा विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

विविध खेळांच्या स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना गोल्ड, सिल्वर व ब्राँझ मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. लिटिल स्कॉलरच्या मुख्याध्यापिका उज्वला राणे, पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख शिल्पा पिटलमकर, कन्याकुमारी ताराळकर, राधिका अकुलवार, प्रतिभा इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. समन्वयक स्नेहलता मेटकर, संगीता महदुरकर यांच्यासह सर्व शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

## सात कलमी कार्यक्रमाचा जिल्हाधिकारी राऊत यांनी घेतला आढावा

**नांदेड (प्रतिनिधी) –** प्रशासकीय सुधारणांसाठी मुलमंत्र ठरू पाहणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शंभर दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमाचा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी गुरुवारी आढावा घेतला. महसूल विभागाचे जिल्ह्यातील सर्व प्रमुख तसेच सर्व उपविभागीय अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

यावेळी त्यांनी या मोहिमेत मागे राहिलेल्या विभागांना सक्त निर्देश देत निर्धारीत वेळेत काम पूर्ण करण्याचे स्पष्ट केले. प्रामुख्याने वेबसाईटचे अद्ययावतीकरण, इज ऑफ लिव्हिंग, स्वच्छता, तक्रार निवारण, सोईसुविधा, गुंतवणूकीस प्रोत्साहन, क्षेत्रिय भेटी या ७ सूत्रांवर त्यांनी भर दिला. या बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यासह उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.

# वृत्तपत्र विक्रेता राज्यस्तरीय अधिवेशन गडचिरोलीत २६ व २७ जानेवारीला

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे २६ व २७ जानेवारी दरम्यान गडचिरोली येथे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजीत करण्यात आले आहे, अशी माहीती राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर यांनी दिली.

श्री पाटणकर यांनी सांगितले, गडचिरोली येथील संस्कृती सभागृहात हे राज्यस्तरीय अधिवेशन होणार असून लॉयड्स मेटल्स स्टील प्लांट कोनसरी कंपनीचे रेसिडेंशिअल डायरेक्टर कर्नल विक्रम मेहता यांच्या हस्ते दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी खनीकर्म व शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर हे राहणार आहेत. ठाण्याचे आमदार संजयजी केळकर, चिमूरचे खासदार नामदेव किरसान, गडचिरोलीचे आमदार मिलिंद नरोटे, अहेरीचे आमदार धर्मरावबाबा आत्राम, आरमोरीचे आमदार रामदास मसराम, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, गडचिरोली जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष मनोहर पोरेटी, माजी खासदार अशोक नेते, माजी आमदार देवराव होळी, माजी आमदार कृष्णाजी गजबे, पोलीस अधीक्षक निलोत्पल, जिल्हा माहिती अधिकारी गजानन जाधव यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे. तसेच राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर, कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी, कोषाध्यक्ष राजेंद्र टिकार सल्लागार शिवगोंड खोत, चामोर्शी बाजार समितीचे अध्यक्ष अतुल गण्यारपवार, गडचिरोली नगराध्यक्ष सुरेश पोरेड्डीवार, गडचिरोली नगरपालिकेचे माजी सभापती विजय गोरडवार, दिनेश ऊक्के, विनोद पन्नासे तसेच राज्यातील उपाध्यक्ष, संघटन सचिव, जिल्हाध्यक्ष उपस्थित राहणार आहेत.

रविवार २६ जानेवारी रोजी दुपारी चार वाजता महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या केंद्रीय समितीची बैठक होणार आहे. त्यानंतर सायंकाळी पाच वाजता राज्य संघटनेच्या कार्यसमितीची बैठक होणार आहे. सहा वाजता सर्वसाधारण सभा होईल. रात्री आठ वाजता खुली चर्चा होणार असून त्यानंतर पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.

दि. २७ रोजी सकाळी ११ वाजता खुले अधिवेशन होणार आहे. त्यात स्वतंत्र कल्याणकारी मंडळ तात्काळ कार्यान्वित करून वृत्तपत्र विक्रेत्यांना न्याय द्यावा अशी मुख्य मागणी या अधिवेशनामध्ये असणार आहे. याशिवाय वृत्तपत्र विक्रेत्यांच्या इतर प्रश्नांसह वृत्तपत्र वितरण वृत्तपत्र व्यवसाय या बाबींवर या अधिवेशनात चर्चा होणार आहे.

महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांनी या अधिवेशनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष बालाजी पवार, का. स. चंद्रकांत घाटोळ, जिल्हा उपाध्यक्ष गणेश वडगावकर, कोषाध्यक्ष बाबू जल्देवार, संदीप कटकमवार, बालाजी चंदेल, सतीश कदम, भागवत गायकवाड, रामेश्वर पवार, अनुप ठाकूर, देवबा डोरले, बापुराव बडूरे व आयोजक गडचिरोली जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष अनिल बाळेकरमरकर व सर्व सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# पंतप्रधान आवास योजनेचे प्रलंबित अनुदान तत्काळ देण्याची मागणी




**माहूर (प्रतिनिधी) –** पंतप्रधान आवास योजनेतील प्रलंबित अनुदान तात्काळ द्यावे, अशी मागणी काँग्रेस जिल्हा सरचिटणीस आनंद पाटील तुपदाळे यांच्या नेतृत्वात शेकडो लाभार्थ्यांच्यावतीने नगर पंचायतचे मुख्याधिकारी विवेक कांदे यांना दि. २१ रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पंतप्रधान आवास योजनेचे अडीच लाखांपैकी १ लाख १० हजार रुपये तब्बल १५०० लाभार्थ्यांचे अनुदान सन २०१७ पासून रखडले आहे. याबाबतचे निवेदन आनंद पाटील तुपदाळे यांनी हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर व नांदेडचे खासदार रविंद्र चव्हाण यांना दिले आहे. दरम्यान, या दोन्ही खासदारांनी हा प्रश्न संसदेच्या सभागृहात उपस्थित करणार असल्याचे सांगितले आहे.

**ही घरकुल योजना की बेघर योजना**

घरकुल योजनेच्या निमित्याने आम्ही कसेबसे निवास करीत असलेली जुनी घरे पाडून बेघर झालो असून अनुदान रखडल्याने घर बांधकाम पूर्ण झाले नाही. उलट आम्हीच कर्जाच्या खाईत लोटल्या गेलो असल्याने ही घरकुल योजना आहे की बेघर योजना अशा संतप्त प्रतिक्रिया अनेक लाभार्थ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

# मनपामध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी) –** महापालिकेच्यावतीने गुरुवार दि.२३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता स्थायी सभागृह कक्ष, येथे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपआयुक्त अजितपालसिंग संधु, लेखाधिकारी श्रीनिवास चन्नावार, सहायक आयुक्त गुलाम सादेक, मनिषा नरसाळे, पद्माकर कावळे, कल्याण घंटेवाड, सुजाता वाडीयार, गजानन रासे, सुमेध बनसोडे, दिनेश सर्कलवाड, धम्मपाल प्रधान, शुभांगी चौधरी, आनंदा खानसोळे यांच्यासह मनपाचे कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागरिकांनी नवीन कायदे जाणून घेण्याची गरज

## ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांचे प्रतिपादन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** भारतात नवीन कायद्यांचा अंमल सुरु झाला आहे. या कायद्यांतर्गत होणारे पोलीस विभागाचे काम तसेच नवीन कायद्यांची सविस्तर माहिती प्रत्येक नागरिकाने जाणून घ्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केले. येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात दि. २२ जानेवारी रोजी नवीन कायदेविषयक माहितीपर कार्यशाळा घेण्यात आली. तीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे, सौ. रेखा काळे, उपनिरीक्षक बाबुराव चव्हाण ॲड.भास्कर हस्सेकर, ॲड. वैष्णवी कोथळकर यांची उपस्थिती होती. ॲड.भास्कर हस्सेकर यांनी भारतीय नागरिक न्याय संहिता, यासह अन्य नवीन कायदा बाबत मार्गदर्शन केले. यात आरोपी समन्स, पोलीस कोठडी, न्यायालय कोठडी, महिला अत्याचारांच्या बाबतीत दाखल झालेल्या गुन्ह्या संदर्भाने माहिती दिली व कायद्यांची माहिती जाणून घेण्याचे आवाहन केले. ॲड. वैष्णवी कोथळकर यांनी कायदा संदर्भात मार्गदर्शन करून महिला कायदा बाबत सविस्तर माहिती दिली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सौ. रेखा काळे यांनी महिला अत्याचारांच्या संदर्भात विविध कायद्यांची माहिती दिली. महिला पोलीस पाटील व पोलीस पाटील यांनी आपापल्या गावात नवीन कायदे संदर्भात अशा कार्यशाळा आयोजीत करून ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याते आवाहन केले. यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, पोलीस कर्मचारी म उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वीतेसाठी गोपनिय शाखेचे पोलिस अंमलदार बालाजी दंतापल्ले, बालासाहेब करके, ज्योती कंधारे यांनी परिश्रम घेतले.

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

## राहा टिपटॉप!

**इमेज बनवणं फक्त सेलिब्रिटीजसाठीच गरजेचं असतं, असं नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतःची एक सकारात्मक प्रतिमा असायलाच हवी. स्मार्ट ड्रेसिंग तुम्हाला तुमची इमेज विकसित करायला हातभार लावेल.**

कोणतेही यूथ आयकॉन पाहिलेत तर तुमच्या लक्षात येईल की त्यांच्या इमेज मेकिंगमध्ये त्यांचे कठोर परिश्रम आणि यशाबरोबरच त्याच्या ड्रेसिंग स्टाइलचं मोठं योगदान असतं. इमेज बनवणं फक्त सेलिब्रिटीजसाठीच गरजेचं असतं, असं नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतःची एक सकारात्मक प्रतिमा असायलाच हवी. तुमच्या परिसरातील व्यक्ती तुमच्याशी कशा वागतात, कशा प्रकारे संवाद साधतात, याचा थेट संबंध तुमच्या इमेजशी आहे. पेहरावात आपल्या कपड्यांबरोबरच, ॲक्सेसरीजचाही (आभूषणं, घड्याळ आदी) विचार करायला लागतो. म्हणजेच स्मार्ट ड्रेसिंग हे फक्त कपड्यापुरतं मर्यादित नसून, आपल्या ओव्हर ऑल लूकशी संबंधित आहे. महागडे कपडे



घालणं किंवा एखाद्या चित्रपटात एखाद्या नायिकेने घातलेल्या कपड्यांची नक्कल करणं म्हणजे स्टायलिश दिसणं नाही. रिझनेबल पैसे खर्च करून आणि आपल्याला काय शोभेल, याचं भान ठेवून कपड्याचं सिलेक्शन करणं जास्त सेन्सिबल आहे. कूल दिसण्याच्या नादात बालिश दिसत नाही ना याची काळजी घ्या. आपल्या कपड्यांची स्वच्छता, इस्त्री याकडे बारकाईनं लक्ष ठेवायला हवं. काही कपडे धूळ आणि तत्सम गोष्टी पटकन खेचून घेतात. यासाठी असे कपडे व्यवस्थित आणि नीटनेटके दिसायला कपड्यांवरील डस्ट साफ करणारा ब्रश वॉर्डरोबमध्ये ठेवणं श्रेयस्कर. शिवाय देश तसा वेश हा नियम लक्षात ठेवा.

## काय हरकत आहे?



**लग्नासाठी वय आणि रुपाइतकाच महत्त्वाचा मुद्दा असतो, मुलाचा पगार. तो जर मुलीपेक्षा कमी असेल तर लग्नाची ती गोष्ट कधीच पुढे सरकायची नाही. पण आता हा ट्रेंड बदलतोय. स्वतःपेक्षा कमी पगार असलेल्या मुलांनाही मुली सहज होकार देताहेत...**

मुलींचं शिक्षण हे अलीकडे मुलांच्या बरोबरीनंच होतं. उच्च शिक्षणानंतर स्वाभाविकपणे मुलींच्या चांगल्या नोकरीच्या अपेक्षाही वाढतात. त्याचप्रमाणे उत्तम पगार असावा आणि स्वतःची कमाई बक्कळ असावी, हा मोह कुणाला होत नाही? आपली शैक्षणिक पात्रता, बौद्धिक कुवत, संभाषण कौशल्य आणि स्मार्टनेस यांसारख्या गुणांवर आपल्याला उत्तम पगाराची नोकरी मिळावी, हा विचार चुकीचा म्हणता येणारंच नाही. काही दिवसांपूर्वी याच कारणामुळे मुलींची लग्न होत नाहीत, असं एक चित्र होतं. इतका भरमसाठ पगार असणारी आणि एवढी शिकलेली मुलगी नको अशा विचारांमुळे मुलींना नकार येत होते. हळूहळू चित्र बदललं, माझाच पगार काही लाखांच्या घरात आहे, तर त्यापेक्षा कमी पगार असलेल्या मुलाशी मी का लग्न करू? या प्रश्नामुळे मुलांना मुलींकडून नकार येऊ लागले. सामाजिक परिस्थितीत लग्नाच्या बाबतीत ही आंदोलनं सुरू असतानाच सुवर्णमध्य काढण्याचे अनेकांचे प्रयत्न सुरूच होते. त्यात लग्नाच्या वयाच्या मुली- मुलं यांच्याप्रमाणेच त्यांचे पालक, नातेवाइक, वधू-वर सूचक मंडळं, मॅरेज कौन्सेलर ही मंडळीही होतीच. या परिस्थितीत बरीचशी सुधारणा होऊन आता आपल्यापेक्षा कमी पगार असलेल्या मुलाशी लग्न करायला मुली तयार होऊ लागल्या आहेत. अखेर, संपूर्ण कुटुंबासाठीच खर्च करायचा, तर जोडीदारापैकी कुणाही एकाला जास्त पगार असलेला पुरेसा आहे, असा समजूतदारपणे केलेला विचार त्यात दिसू लागला आहे. अर्थात, याचं प्रमाण लव्ह मॅरेजमध्येच जास्त आहे. तरीही ठरवून लग्न करतानाही अगदीच लग्न न ठरण्यापेक्षा मुलाचा पगार कमी असला, तरी चालेल, ही भूमिका मुली घेताना दिसतात.



## मोठं कपाळ... डोन्ट वरी असं करा

## चेहऱ्याचं स्टायलिंग!

**सौंदर्याच्या मापदंडानुसार चेहऱ्याची ठेवण असणं म्हणजे दुर्मिळ गोष्ट! आपल्यापैकी प्रत्येकाच्या चेहऱ्यात काही तरी उणीव किंवा वेगळेपण असतंच. मोठं किंवा रूंद कपाळ हे त्यापैकीच एक. असं कपाळ असणं हे बुद्धिमत्तेचं लक्षण समजलं जात असलं, तरी ते चेहऱ्याच्या सौंदर्याला बाधा आणू शकतं. कपाळ खूप मोठं असेल, तर हेअरस्टाइलचीही विशेष काळजी घ्यावी लागते. असं कपाळ असणाऱ्यांनी चेहऱ्याचं स्टायलिंग नेमकं कसं करावं याच्या टिप्स...**



कोणतीही हेअरस्टाइल करताना केस मागे वळवू नका. पोनीटेल शक्यतो टाळाच. केस मागे वळवल्यानं चेहरा ओढल्यासारखा दिसतोच. शिवाय कपाळ आणखी मोठं दिसू लागतं. यामुळे हेअरलाइन हळूहळू मागे जाण्याची शक्यताही असते. भांग पाडून किंवा केसांच्या बटा थोड्या चेहऱ्यावर येतील अशी हेअरस्टाइल करा. हेडबँड्स, बंधाना, स्कार्फ आणि हॅट अशा ॲक्सेसरीजचा आवर्जून वापर करा. यामुळे तीच तीच हेअरस्टाइल करण्यानं आलेला कंटाळा जाईल आणि प्रसन्न वाटेल. कपड्याला कॉन्ट्रास्ट होतील अशा रंगाचे स्कार्फ स्टायलिश पद्धतीनं बांधता येतील. बंधाना ही तर सदैव लोकप्रिय असलेली फॅशन असल्यामुळे मोठं कपाळ लपवण्यासाठी तिचा चांगला वापर करता येईल. केस बऱ्यापैकी मोठे असतील, तर एखादी बट रंगवून तिच्याकडे लक्ष वेधता येईल. केस कलर करायचे नसतील, तर कृत्रिम बट बाजारात मिळते, तिचा वापर करता येईल. डोळ्यांचा उत्तम मेकअप ही मोठं कपाळ लपवण्यासाठीची सर्वात चांगली युक्ती आहे. त्यासाठी चेहरा आणि कपाळ यांच्या प्रमाणानुसार भुवया कोरून घ्या. आयब्रोज करताना त्याला टोक ठेवा. डोळ्यांचा चांगला मेकअप कसा करायचा याचं तंत्र शिकून घ्या. मेकअप चांगला असेल, तर पाहाणाऱ्याचं लक्ष मोठ्या कपाळाकडे न जाता डोळ्यांकडे जाईल. मोठ्या कपाळामुळे एकंदर चेहराही खूप मोठा वाटतो. तो तसा वाटू नये यासाठी योग्य हेअरकट करणं गरजेचं आहे. म्हणजे चेहऱ्यामध्ये एकप्रकारचा समतोल राखला जाईल. सरळसोट हेअरकट शक्यतो टाळा. केस दाट (व्हॉल्यूम) दिसतील, ते फुलतील (बाउन्स होतील) असा हेअरकट निवडा.

## ट्रान्सपरन्ट अनारकलीची स्टाइल

भरजरी अनारकलीची स्टाइल अजूनही इन आहेच. पण सध्या चलती आहे, ट्रान्सपरन्ट अनारकलीची. या ट्रान्सपरंट घेरामुळे चुडीदारवरचं वर्कही दिसून येतं आणि छान लूकही मिळतो.

फॅशनच्या बाबतीत बोलू तेवढं कमीच आहे. दररोज बाजारात एक नवी फॅशन दिसते. त्यातही कपड्यांच्या तऱ्हा तर पाहायलाच नकोत. सध्या लग्नसराईचा मोसम सुरू आहे. त्यामुळे आलेल्या पाहुण्यांपैकी नव्वद जणींचा अनारकली सुट असतोच असतो. कॉटन अनारकली, वर्क्ड अनारकली, शरारा अनारकली, पेटलेट्स अनारकली, डबल घेर अनारकली असे विविध प्रकार यात पहायला मिळतात. त्यातच आता भर पडलीय, ट्रान्सपरंट अनारकलीची. सध्या हे ड्रेसेस टीव्ही, सिनेमाच्या तारकांवर झळकताना दिसले तरी लवकरच ते बाजारात दिसतील. या ड्रेसचा वरचा अर्धा भाग कॉटन, शिफॉन, वेलवेट अशा मटेरिअलचा असून त्यावर पूर्णतः वर्क केलेलं असतं. तर ड्रेसचा खालचा घेर संपूर्ण ट्रान्सपरंट असतो. या स्टाइलची खासियत म्हणजे त्याची सलवार प्लेन नसून, चुडीदार स्टाइलची मस्त भरीव वर्क केलेली असते. पायावरची ही डिझायनर चुडी उठून दिसावी म्हणूनच अनारकलीची घेर ट्रान्सपरंट ठेवला जातो. या पॅटर्नमध्ये क्रेप, सिल्क, वेलवेट, क्रश अशा मटेरिअल्सला जास्त मागणी आहे. ही फॅशन नवखी असली तरी अनेक मैत्रिणी त्याला पसंती देताना दिसताहेत. अनारकली ड्रेसइतकाच महत्त्वाचा असतो त्याचा चुडीदार. पण अनारकलीवर खूपच वर्क असल्याने पायावरची चुडी झाकली जाते. मग ती डिझायनर चुडी दिसण्यासाठी अनारकलीच्या टॉपमध्ये असा बदल करण्यात आला आहे.



## अनुष्काला आवडतात मुलांचे कपडे!

बॉलिवूडमध्ये कितीही स्पर्धा असली तरी अभिनेत्री अनुष्का शर्माला याची फिकीर नाही. फॅशनच्या बाबतीतही ती उगाच सगळे ट्रेंड फॉलो करायला जात नाही. मला मुलांसारखेच जीन्स-टी शर्ट घालायला आवडतं, असं ती सांगते. मला साधंसुधं रहायलाच आवडतं. उगाचच हा ट्रेंड फॉलो करा, त्याच्या मागे पळा असं मी करत नाही. माझ्यासाठी आवडीचे कपडे म्हणजे जीन्स-टीशर्ट, यात मी एकदम कम्फर्टेबल असते, अभिनेत्री अनुष्का शर्मा सांगते. गो स्लीवलेस या स्पर्धेच्या निमित्ताने अनुष्काने गप्पा मारल्या. कोणत्याही हिरोइनसाठी शॉपिंग हा वीक पॉइंट असला तरी अनुष्का त्याला अपवाद आहे. तिला स्वतःसाठी फारशी खरेदी करायला आवडत नाही. मला इतरांसाठी, विशेषतः भावासाठी खरेदी करायला खूप आवडतं, असं ती सांगते.

## मिस बॅगवती

**प्रत्येक ठिकाणी जाताना तुम्ही एकच बॅग वापरता, की गरजेनुसार वेगवेगळी बॅग वापरता. छोट्यात छोटी पर्स वापरता, की भलीमोठी झोळी... बॅगच्या प्रकारावरून स्वभावाचा अंदाज बांधता येतो हे तुम्हाला माहीत आहे का?**



- **टोटे बॅग : ही बॅग खांद्याला लटकवलेली असेल आणि तरीही सतत तिचा एक हात या बॅगेवरच असेल तर समजायचं की ही मुलगी हिच्या गोष्टींबद्दल खूप पझेसिव्ह आहे. तिला तिच्या गोष्टी जपायला खूप आवडतात. मोठ्ठी टोटे बॅग असेल तर समजायचं की हिच्या या भल्या मोठ्या बॅगमध्ये तिच्या लिपस्टिक, हँड सॅनिटायझर, टिश्यू, पाण्याची बाटली, पुस्तक असा सगळा जामानिमा असणार.**
- द स्लिंग बॅग : ही बॅग वापरणाऱ्या मुली एकदम हिप्पी स्टाइलच्या असतात. धम्माल- मस्ती करायला त्यांना जाम आवडते. कॉलेजच्या मुलींमध्ये अशा बॅग्ज विशेष लोकप्रिय आहेत.
- क्लच : क्लच वापरणाऱ्या पोरींचं सगळं कसं व्यवस्थित आणि जेवढ्यास तेवढं असतं. त्यांना कुठे किती सामान न्यायचंय याचा पक्का अंदाज असतो. त्यामुळेच त्या क्लचसारखी छोटीशी बॅग खूप आत्मविश्वासाने वापरतात.
- छोट्या बेल्टची बॅग : ज्या महिला अशी हातातली बॅग वापरतात त्या अत्यंत आत्मविश्वासू असतात. त्या व्यवसायही उत्तम रितीने सांभाळतात. आपण काय आहोत आणि आपल्याला काय करायचंय आणि आपण काय करतोय हे त्या पक्कं ओळखून असतात.
- वन साइडेड बॅग : तुम्ही वन साइडेड बॅग वापरता का? मग तुम्हाला नक्कीच मोकळं राहायला आवडत असणार. त्यातही तुम्ही जर काळा, तपकिरी अशा रंगाच्या बॅग्ज वापरत असाल तर तुम्ही साध्यासुध्या आहात. या बॅग्ज जर निऑन कलर्सच्या किंवा रंगीबेरंगी असतील तर ती मुलगी नक्कीच फॅशनची हौस असलेली, खट्याळ आणि बिनधास्त असली पाहिजे.

## सांभाळा शोभेच्या वस्तूंना

**घरात वेगळ्या शोभेच्या वस्तू ठेवण्यासाठी आपण ॲंटिक वस्तू घेतो. मात्र, त्यांची काळजी घेणं महत्त्वाचं असतं. त्यासाठीच काही टिप्स...**



- सहा महिन्यातून एकदा पेंटिंगचा कॅनव्हास आणि फ्रेम तपासून पाहावी. फ्रेम बदलता येत असेल, तर आवर्जून बदला.
- सुक्या आणि मऊसर कपड्यानं चित्राची फ्रेम रोज स्वच्छ करा. ॲंटिक वस्तू फक्त मऊसर कोरड्या कपड्यानंच साफ करा. अथवा मऊ धाग्यांचा टूथ ब्रश वापरा.
- सूर्याची किरणं जिथं पडतील, आग किंवा हिटरच्या ठिकाणी चित्रं आणि इतर ॲंटिक वस्तू ठेऊ नका.
- एखादी वस्तू ती पॅक करून ठेवताना विशेष काळजी घ्या. कापूस, बँडेज किंवा एखादा मऊसर कपड्यात ती आधी बांधून घ्या. मग त्यावर पेपर लावा. त्या आकाराचा बॉक्स मिळाला तर त्यात ठेवा.
- अन्यथा, प्लास्टिक किंवा कॉटनच्या पिशवीची व्यवस्था करा. यामुळे तिची चकाकी टिकून राहाते. बांधून ठेवली, तरी सहा महिन्यातून एकदा त्या वस्तूची तपासणी करा.

## घरातलं कापडी सौंदर्य!

**घराच्या सजावटीत अत्यंत कल्पकपणे केलेला कापडाचा वापर त्या घराच्या सौंदर्यात आणखी भर घालतो. हल्ली इंटेरिअर डिझायनिंग करताना ढोबळमानानं फक्त सोफा- बेड, टीव्ही असं फर्निचर आणि फ्रेम्स, लॅम्पशेड, फ्लॉवरपॉट अशा कलात्मक वस्तू घेतल्या जात नाहीत, तर विशिष्ट थीमनुसार सजावट केली जाते. त्या थीमला साजेसे रंग, वस्तू यांवर सखोल विचार करून सजावट केली जाते. सजावटीसाठी आजकाल विविध प्रकारची फॅब्रिक वापरली जाऊ लागली आहेत. फॅब्रिक वापरण्यामुळे घराला एक प्रकारचा एथनिक लूक येतो, शिवाय त्यातून घरात राहणाऱ्यांच्या कलादृष्टीचाही अंदाज येतो.**



### काय करता येईल?

- पूर्वी फॅब्रिकचा वापर बेडशीट, अभ्रे आणि पडदे यांच्यापुरता मर्यादित होता. आता अगदी भिंतींवरच्या फ्रेममध्येही फॅब्रिक वापरता येतं. सोफ्याचं कव्हर आणि कुशन्ससाठी कॉन्ट्रास्ट पद्धतीनं गडद रंग वापरता येतील. कुशन्सवर पॅचवर्क, मिरर वर्क करता येईल. खास प्रसंगांसाठी सिल्कचे कुशन्स वापरता येतील. या कुशन्सला गोंडे लावल्यास किंवा एम्ब्रॉयडरी केल्यास आणखी सुंदर दिसेल. एकच प्रकार ठेवायचा असेल, तर सिल्क आणि ब्रोकेड किंवा फॅब्रिक आणि लेदर असं कॉम्बिनेशन वापरता येईल.
- घरामधल्या छोट्या छोट्या वस्तूंमध्येही फॅब्रिकचा सहज वापर करता येईल. उदा. फोटो लावण्याची फ्रेम एखाद्या जरीकाठानं सुशोभित करता येईल. कुटुंबातील सर्वांचा एकत्र फोटो असल्यास त्याच्या फ्रेमला सोनेरी बॉर्डर्स, बीड्स, खडे, मिरर वर्क लावून सजवता येईल. याशिवाय वापरात नसलेल्या साडीचा भरजरी पदर फ्रेम करून भिंतीवर लावल्यास तोही छान दिसेल.
- टेबलामध्ये फॅब्रिकची एक थीम कायम ठेवता येईल. उदा. खुर्च्यांचं फॅब्रिक, नॅपकिन होल्डर, टेबल मॅट्स यासाठी एकाच प्रकारचं फॅब्रिक किंवा त्याच प्रकारच्या फॅब्रिकचे वेगळे रंग वापरून एकवाक्यता साधता येईल.
- बेडरूम, स्टडीरूम, गेस्टरूम अशा वेगवेगळ्या खोल्यांमधल्या फर्निशिंगला एक थीम देऊन तिथंही फॅब्रिकचा उत्तम वापर करता येईल. उदा. गेस्ट रूममध्ये सर्वांना आवडतील अशा न्यूट्रल रंगाचे पडदे, अवजड फर्निचरऐवजी सेटी किंवा टू- इन वन बेड ठेवता येईल. छोटंसं सेंटर टेबल ठेवून त्यावर खोलीच्या रंगाला साजेसा टेबलक्लॉथ वापरता येईल.
- तुमच्या बेडरूममध्ये बेडशीट, कुशन्स, वॉर्डरोब, पडदे, बाथरूम ॲक्सेसरीज यांसाठी वापरलेल्या फॅब्रिकमध्ये एक थीम ठेवा. त्यासाठी प्रसन्न रंग निवडा.



- स्टडी रूममध्ये फार भडक रंग वापरू नका. आरामात बसून वाचता येईल अशा विविध आकाराच्या खुर्च्या किंवा रेकलायनर्स घ्या. त्यांचं फॅब्रिक शक्यतो बेज, मस्टर्ड, फिकट विटकरी अशा रंगांमधून निवडा. लॅम्पशेडसाठी फॅब्रिकचा कल्पक वापर करता येईल.

## दागिन्यांची देखभाल



**मुलींना दागिने घेण्याची भारी हौस. नानाप्रकारचे दागिने त्यांच्याकडे असतात. मात्र त्यांची चमक दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी व्यवस्थित देखभाल करणंही गरजेचं आहे. मग ते सोनं असो, मोती असो, डायमंड असो किंवा इतर खड्यांचे दागिने असोत. त्यांच्या देखभालीसाठी ठरलेलं असं तंत्र आहे. त्याच्याच काही टिप्स...**

- डायमंड, खडे आणि मोत्यांच्या दागिन्यांना डबी किंवा कोणत्या पाकिटात ठेवताना कोंबून ठेऊ नका. ते मोकळे राहतील याची काळजी घ्या.
- खड्यांचे दागिने मऊ अशा कपड्याच्या पाकिटामध्येच ठेवा. तसंच, ते एकमेकांवर घासले जाणार नाहीत, याचीही काळजी घ्या. अन्यथा, त्याचं पॉलिश खराब होईल.
- खरेदी केले आणि कपाटात ठेवले, की झालं असं दागिन्यांचं नसतं. त्यांची योग्य ती स्वच्छता करावी लागते. धूळ, त्वचेचं तेल यामुळे त्यांचा चकचकीतपणा जाऊ शकतो.
- साबण आणि पाण्याच्या साहाय्यानं; पण हलक्या हातानं दागिने साफ केले पाहिजेत. यासाठी ज्या साबणामध्ये सोडा नसेल, असा सौम्य साबण वापरावा. नंतर, कॉटनच्या मुलायम कपड्यानं त्याला पुसून घ्या. एअर ड्राय आणि वेळोवेळी पॉलिश हेसुद्धा महत्त्वाचे टप्पे आहेत.
- दागिन्यातली कलाकुसर खूपच नाजूक असते. त्याच्यात बऱ्याच खाचाखळगाही असतात. त्या साफ करणं अनेकदा मुश्कील होऊन जातं. त्यासाठी सौम्य कंगोऱ्यांचा (ब्रिसल्स) टूथब्रश वापरता येईल. तसंच, अमोनिया आणि पाणी यांचं मिश्रणही याकामी येऊ शकतं.
- कोणत्याही दागिन्यांचं विशेषतः खड्यांच्या दागिन्यांचं सेटिंग तपासून घ्या. त्यातील खडे सराफानं व्यवस्थित बसवले आहेत, याची खातरजमा करून घ्या. पेंडंट वगैरे साखळीला जोडलं असल्यास त्याचं सेटिंग पाहून घ्या.



# आदिवासींच्या प्रश्नांवर राजकारणापलीकडे विचार व्हावा –राज्यपाल राधाकृष्णन

**मुंबई (प्रतिनिधी)** – आदिवासींच्या प्रश्नांवर राजकारणापलीकडे विचार झाला पाहिजे. विकसित भारत म्हणजे सर्वसमावेशक विकास. विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावले पाहिजे. यासाठी सर्व लोकनियुक्त प्रतिनिधींनी प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी गुरुवारी येथे केले.



राज्यातील नवनियुक्त आदिवासी खासदार व आमदारांचा सत्कार राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते बुधवारी (दि. २२) सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र प्रांतातर्फे नवनियुक्त आदिवासी खासदार व आमदारांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रपती भवन येथे झालेल्या राज्यपालांच्या परिषदेत आपण आदिवासी विकासविषयक उपसमितीचे अध्यक्ष होतो असे सांगून आदिवासी विकासाकडे विशेष लक्ष्य देण्यासाठी राजभवन येथील आदिवासी कक्ष पुनरुज्जीवित करण्यात आला असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

राज्यात आदर्श आदिवासी गाव विकसित केले जात असून त्याठिकाणी निवासी संकुल, शाळा, आरोग्यकेंद्र, समाजमंदिर, शॉपिंग कॉम्प्लेक्स आदी सुविधा असतील. याशिवाय नाशिक येथे स्वतंत्र आदिवासी विद्यापीठ निर्माण केले जाणार असून तेथे आयआयटी दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय व एम्सच्या धर्तीवर वैद्यकीय महाविद्यालय उभारले जाईल. या विद्यापीठातील ८० टक्के जागा केवळ आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राखीव राहतील. आपण लवकरच राज्यातील आदिवासी गावांना भेट देणार असून अति आदिम समाजाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी राज्यातील प्रत्येक विद्यापीठात आदिवासी मुला-मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्यासाठी जागा देण्यात यावी, अशी मागणी केली. वनहक्क कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी तसेच कातकरी समाजाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले जावे, अशी अपेक्षा डॉ. उईके यांनी व्यक्त केली.

यावेळी वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष सत्येंद्र सिंह यांनी लोकशाही, पंचायत, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण रक्षण याबाबतीत आदिवासी जीवनशैली समाजाला मार्गदर्शक असल्याचे सांगितले. आदिवासी आमदारांनी आपल्या समाजाच्या समस्या पक्षाच्या व्यासपीठावर तसेच विधानमंडळात जोरकसपणे मांडाव्या, असे त्यांनी सांगितले. आमदारांनी निवडून आलेल्या आपल्या भागात पाच वर्षे विकास पुरुष होऊन कार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाला अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आश्रमाच्या कोकण प्रांताचे अध्यक्ष विष्णू सुरूम, ऑलिम्पिक स्पर्धेतील धावपटू कविता राऊत तुंगार तसेच नवनियुक्त आदिवासी आमदार उपस्थित होते. यावेळी राज्यातील १७ आदिवासी आमदारांचा सत्कार करण्यात आला.

राज्यपालांच्या हस्ते सर्व आमदार राजेश पाडवी, काशीराम पावरा, केवलराम काळे, राजू तोडसाम, दिलीप बोरसे, हरिश्चंद्र भोये, आमश्या पाडवी, मंजुळाताई गावित, चंद्रकांत सोनावणे, राजेंद्र गावित, नितीन पवार, दौलत दरोडा, डॉ किरण लहामटे, शांताराम मोरे, भीमराव केराम, नरहरी झिरवाळ व डॉ अशोक उईके यांचा सत्कार करण्यात आला.

# कर्जाच्या नावाखाली ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या सेवा केंद्रावर छापा; ७ जणांना अटक

**मुंबई (प्रतिनिधी)** – ऑनलाईन फसवणूक करणारे सेवा केंद्र उद्ध्वस्त करण्यात सांताक्रूझ पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत सात जणांना अटक करण्यात आली असून त्यात तीन महिलांचा समावेश आहे. आरोपीविरोधात माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सांताक्रूझमधील जुहू तारा रोडजवळील मांगेलवाडी येथे वास्तव्यास असलेले प्रवीण साळुंखे यांना एका अनोळखी व्यक्तीचा फोन आला होता. त्याने बजाझीन हॉलिडे ट्रॅव्हल्स कंपनीमधून बोलत असल्याचे सांगितले. ऑनलाईन कर्ज मिळवून देतो, असे सांगून त्याने प्रक्रिया शुल्कापोटी साळुंखे यांच्याकडून दोन लाख ६० हजार रुपये ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले. पण साळुंखे यांना कोणत्याही प्रकारचे कर्ज दिले नाही.

फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर साळुंखे यांनी १५ जानेवारी रोजी पोलिसाकडे धाव घेऊन तक्रार केली. त्यांच्या तक्रारीनुसार सांताक्रूझ पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३१९ (२) व माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायदा कलम ६६ (सी), ६६ (डी) अंतर्गत गुन्हा दाखल केला. याप्रकरणी तपासात तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपी पवई प्लाझा, जे. व्ही. एल. आर. रोड, पवई, मुंबई येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मंगळवारी तेथे छापा टाकून सात जणांना अटक केली. त्यात तीन महिलांचा समावेश आहे. दीपक मनोज सिंह, सुमीत विनय मिश्रा, राहुल अवधेश सिंह, सुवर्णा अमोल चव्हाण, मिसबा कलीम शेख, आम्रपाली नवनाथ काटे व मानसी आकाश लाड अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून त्यांना न्यायालयाने २४ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

अटक आरोपींकडून १५ मोबाइल, ४ लॅपटॉप, ४९ पाकिट एअरटेल कंपनी सिमकार्ड, व्होडाफोन कंपनीचे वापरलेले ८ सिमकार्ड, १ प्रिंटर असा एकूण चार लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींनी अशा प्रकारे अनेकांची फसवणूक केल्याचा संशय असून पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

## खासगी शाळेत बॉम्बची धमकी

**मुंबई (प्रतिनिधी)** –मुंबईतील एका शाळेत बॉम्बची धमकी मिळाली आहे. मुंबईतील अंधेरीच्या जोगेश्वरी-ओशिवरा भागातील रायन ग्लोबल स्कूलला ही धमकी देण्यात आली होती. स्थानिक पोलीस आणि बॉम्बशोधक पथकाच्या कर्मचाऱ्यांनी कारवाई केली असून परिसराची झडती घेतली असल्याचं मुंबई पोलिसांनी सांगितले.

## प्रजाकसत्ताक दिनी संविधानाचा जागर

### सामाजिक न्याय विभागाचा घर घर संविधान उपक्रम

**मुंबई (प्रतिनिधी)** –भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सन २०२४-२५ पासून घर घर संविधान उपक्रम राज्यात राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत प्रजाकसत्ताक दिनी संविधानाचा जागर होणार आहे.



प्रजासत्ताक दिनी म्हणजेच दि. २६ जानेवारी २०२५ रोजी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी भारतीय संविधानाबद्दल माहिती देणारे कार्यक्रम व संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाटप पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत सर्व आस्थापनांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात येणार आहे.

## राजस्थानातील एकाकडून २२ लाख रुपयांची अफू जप्त

**पुणे (प्रतिनिधी)** –राजस्थानातून अफू विक्रीसाठी घेऊन आलेल्या एकाला अमली पदार्थ विरोधी पथकाने कोंढवा भागात पकडले. त्याच्याकडून २१ लाख ८० हजार रुपयांची एक किलो ९० ग्रॅम अफू जप्त करण्यात आली.

नाथूराम जीवनराम जाट (वय ५२, रा. असावरी, जि. नागोर, राजस्थान) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. जाट याच्याविरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोंढवा भागातील अमली पदार्थ विरोधी पथकातील कर्मचाारी गस्त घालत होते. त्या वेळी जाट तेथून निघाला होता. त्याच्याकडे पिशवी होती. पोलिसांच्या पथकाने संशयावरुन त्याची चौकशी केली. पिशवीची तपासणी केली. तेव्हा पिशवीत अफू सापडली.

पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक उल्हास कदम, सहायक निरीक्षक अनिकेत पोटे, दयानंद तेलंगे पाटील, संदीप शिर्के, विशाल दळवी, सचिन माळवे, प्रवीण उत्तेकर यांनी ही कारवाई केली. आरोपी नाथूराम जाट मूळचा राजस्थानातील आहे. तो पूर्वी फर्निचरचे काम करायचा. झटपट पैसे कमाविण्यासाठी त्याने राजस्थानातून अफू विक्रीस आणली होती. त्याने आतापर्यंत कोणाला अफू विक्री केली, यादृष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

# टोरेस गैरव्यवहार प्रकरणः मुंबई व जयपूर येथील १३ ठिकाणी 'ईडी'चे छापे

**मुंबई (प्रतिनिधी)** – टोरेस गैरव्यवहार प्रकरणात सक्तवसुल संचालनालयाने (ईडी) गुरूवारी १३ ठिकाणी छापे टाकले आहेत. त्यात मुंबईतील १० व जयपूर येथील तीन ठिकाणांचा समावेश असल्याची माहिती ईडीने दिली. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने नऊ परदेशी आरोपींविरोधात नुकतीच ब्लू कॉर्नर नोटीस जारी केली होती. त्यात आठ युक्रेनचे व एक तुर्कस्थानचा नागरिक आहे. याप्रकरणातील मुख्य आरोपीने २०० कोटी रुपये परदेशात पाठवल्याचा संशय आहे. त्याबाबत ईडी तपास करत आहे.

ईडीकडून गुरूवारी सकाळपासूनच मुंबईतील १० ठिकाणी शोध मोहिम राबवण्यात येत आहे. त्याशिवाय राजस्थानमधील ३ ठिकाणी शोध मोहिम राबवण्यात येत आहे. मुंबई, ठाणे, कल्याण अशा वेगवेगळ्या भागांमध्ये 'टोरेस' नावाने शाखा उघडून ग्राहकांना सोने, चांदी आणि हिऱ्याचे दागिने देणाऱ्या कंपनीने हळूहळू पैशांत गुंतवणूक स्वीकारायला सुरुवात केली. वर्षभर व्यवसायही केला.

या गैरव्यवहारात सव्वा लाख गुंतवणूकदारांनी एक हजार कोटी रुपये गमावल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. पोलीसांनी संशयित सूत्रधार ओलेना स्टोइयान, व्हिक्टोरिया कोव्हालेन्को, मुस्तफा कराकोच, ओलेक्झांडर बोराविक, ओलेक्झांडर झापिचेंको, ओलेक्झांड्रा ब्रुंकीव्स्का, ओलेक्झांड्रा त्रेडोखिब, आर्टेम ओलिफरचुक आणि इयुर्चेंको यांच्या विरोधात ब्लू कॉर्नर नोटिस जारी केल्या आहेत. तक्रारदार भाजी विक्रेते वैश्य (३१) यांनी याप्रकरणी सव्वा लाख लोकांनी टोरेस कंपनीत पैसे गुंतवल्याचा दावा केला आहे. आतापर्यंत तीन हजार ७११ गुंतवणूकदार पोलिसांसमोर आले असून त्यामुळे फसवणुकीची रक्कम ५७ कोटींवर पोहोचली आहे. ईडी याप्रकरणी फेब्रुवारी २०१३ पासून प्लॅटिनम हर्न प्रायव्हेट लिमिटेडच्या सर्व आर्थिक व्यवहारांची तपासणी करणार आहे. गुंतवणूक करण्यात आलेली रक्कम रोख स्वरूपात आहे. त्यानंतर दादर येथील शाखेत रक्कम जमा करून ती कथित स्वरूपात हवाला नेटवर्कद्वारे कूटचलनाद्वारे परदेशात पाठवण्यात आल्याचा संशय आहे. या प्रकरणात २०० कोटी रुपये परदेशात पाठवण्यात आल्याचा संशय आहे. त्याबाबत ईडी तपास करत आहे. टोरेसकडून अनेक गुंतवणूक योजना राबवण्यात आल्या होत्या. त्यात दर आठवड्याला सहा टक्के व्याज देण्याचे आमीष दाखवण्यात आले होते.

मुंबई, नवी मुंबई, आणि मीरा रोड येथील हजारो गुंतवणूकदार ६ जानेवारी रोजी टोरेसच्या दादर, मीरा रोड, आणि एपीएमसी नवी मुंबई येथील कार्यालयाबाहेर जमले आणि डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून त्यांचे व्याज थकवले गेल्यामुळे आंदोलन नागरिकांनी आंदोलन केले.

## कामगाराच्या घराला भीषण आग, पाच लाखांची रोकड जळून खाक

**पुणे (प्रतिनिधी)** – पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपळे गुरव परिसरात असलेल्या काशीद पार्कजवळील एका बिगारी कामगाराच्या घराला गुरुवारी भीषण आग लागली. या आगीत या कामगाराचे अंदाजे पाच लाख रुपये जळून खाक झाले आहेत. घराला आग नेमकी कशामुळे लागली हे स्पष्ट झाले नाही.



अग्निशमन दलाच्या जवानांनी वेळीच आगीवर नियंत्रण मिळवल्याने कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मुख्य अग्निशमन केंद्र आणि रहाटणी अग्निशमन केंद्रातून चार अग्निशमन बंब घटनास्थळी पाठवण्यात आल्याची माहिती अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले यांनी दिली. दाट लोकवस्तीमुळे अग्निशमन बंबाला घटनास्थळी पोहोचण्यास विलंब झाला. आग २० मिनिटांत आटोक्यात आणण्यात आली. कामगाराने घरात ठेवलेली रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तू जळल्या. २० पत्र्याची घरे या आगीत उद्ध्वस्त झाली असून, सुमारे पाच लाख रुपये रोख रक्कम आणि पाच तोळे सोन्याचे दागिने असे दहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज अग्निशमन दलाने वर्तविला आहे.

# पोलीस असल्याचे भासवून महिलेचे सहा लाखांचे दागिने चोरले

**पुणे (प्रतिनिधी)** – पोलीस असल्याच्या बतावणीने महिलेचे सहा लाख रुपयांचे दागिने चोरुन नेल्याची घटना सिंहगड रस्ता परिसरात घडली. याबाबत एका महिलेने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला वडगाव बुद्रुक परिसरातील एका मंगल कार्यालयात आल्या होत्या.

विवाह समारंभ आटोपून त्या दुपारी तीनच्या सुमारास मंगल कार्यालयातून बाहेर पडल्या. त्या वेळी दोन चोरट्यांनी त्यांना अडवले. चोरट्याने खाकी रंगाची पँट परिधान केली होती. त्यांनी महिलेकडे पोलीस असल्याची बतावणी केली. या भागात महिलांकडील दागिने चोरीला जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. दागिने काढून पिशवीत ठेवा, अशी बतावणी चोरट्यांनी त्यांच्याकडे केली. त्यानंतर महिलेने पिशवीत दागिने ठेवली. पिशवीत दागिने ठेवले का नाही, याची तपासणी करण्याचा बहाणा करुन चोरट्यांनी महिलेच्या नकळत दागिने काढून घेतले. महिलेचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरटे दुचाकीवरुन पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक किरण लिटे तपास करत आहेत.

## बाळासाहेब ठाकरे यांना विधान भवनात अभिवादन

**मुंबई (प्रतिनिधी)** – हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती यांच्या जयंतीदिनी विधान भवनात अभिवादन करण्यात आले. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर व विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विधानपरिषदेच्या सदस्या आमदार मनीषा कायंदे तसेच विधानसभेचे अध्यक्ष यांचे सचिव सुनिल वाणी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे अवर सचिव विजय कोमटवार व विशेष कार्य अधिकारी सोमनाथ सानप यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही अभिवादन केले.

## टी. सी. हरवली

माझी अप्पा मधुकर कोल्हे या नावाची दहावी पासची टी.सी., मार्कशीट, सनद कंधार ते नांदेड प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.


**:: संपर्क ::**
**अप्पा मधुकर कोल्हे**
**मो.७७९८५३९२१३**

## Change In Name

I HAVE CHANGED MY NAME FROM (OLD NAME) ANJUMARA FAROOQI TO (NEW NAME) ANJUM ARA AMRULLA FAROOQI. ADD- RAZA NAGAR HADGAON TQ HADGAON DIST NANDED MAHARASHTRA 431712.

CONSULTING PHYSIOTHERAPIST
कन्सल्टिंग फिजिओथेरपीस्ट
डॉ.ईश्वर जी. हिंगोलीकर (PT) (B.P. Th)
उपलब्ध सुविधा
• कपिंग थेरपी (गोल्ड मेडलिस्ट) • ड्राय नीडलींग थेरपीस्ट
• ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन • टेपींग थेरपीस्ट
• न्यूरो रिहॅबिलिटेशन
नांदेड
होम व्हिजीट उपलब्ध 9657631231

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे
डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.
संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



ऑफर ऑफर A/C ऑफर
महाराष्ट्र जेन्टस् ब्युटी सलुन
फेशियल
१) गोल्ड फेशियल 499/-
२) VLCC फेशियल 499/-
३) डायमंड फेशियल 599/-
डी-टॅन
१) O3+ 349/-
२) रागा 299/
ब्लीच
१) ऑक्सी ब्लीच 299/-
२) ओलिविया ब्लीच 299/-
कलर
१) लोरियल 299/-
२) मॅट्रिक्स 299/-
३) रागा 249/-
४) गार्नियर 199/-
हेयर स्पा
१) लोरियल 249/-
२) मॅट्रिक्स 249/-
हॉटेल मंजू समोर, वजिराबाद, नांदेड. 9822972221

## टी. सी. हरवली

माझी म.मजम्मीलखान म.आयुबखान या नावाची १२ वी पासची टी.सी नांदेड ते उदगीर बस प्रवास करत असताना हरवली आहे.कोनास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.**संपर्क नंबर-म.मजम्मीलखान म.आयुबखान रा.नांदेड मो.७३८७५८६३९७**

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात, किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २२/२०२५ पु. ता. – २७/२/२०२५

अर्जदार-१.रामबाई बावन्ना तुमीडवार, वय ७३ वर्षे, व्यवसाय-शेती,रा.कुभारगल्ली कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड २.महादबाई भ्र.विठ्ठलराव राजरवाड वय ४५ वर्षे धंदा शेती रा.लगळूद ता.भोकर जि.नांदेड ३.सायलू पि.बावन्ना तुमीडवार वय ४८ वर्षे धंदा शेती रा.शतरंजी गल्ली कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड ४.बालाजी बावन्ना तुमीडवार वय ३९ वर्षे धंदा शेती रा.नरागल्ली कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड ५. भुमन्ना बावन्ना तुमीडवार वय ३५ धंदा शेतीरा.शतरंजी गल्ली कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड ६.लक्ष्मी नरसिंग बोमडुले वय २७ वर्षे धंदा शेती रा.आदमपुर ता.बिलोली जि.नांदेड

विरुध्द-गैरअर्जदार-निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ६ यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ व ६ हे मयत मोगलाजी भूमन्ना तुमीडवार व बाबन्ना भूमन्ना तुमीडवार यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्रमांक १ व २ ही मयत मोगलाजी भूमन्ना तुमीडवार व बाबन्ना भूमन्ना तुमीडवार हे सख्खे भाऊ होते.अर्जदार क्र १ही मयत बाबन्ना भूमन्ना तुमीडवार यांची पत्नी आहे.व अर्जदार २ ते ६ या मयत बाबन्ना भूमन्ना तुमीडवार यांच्या मुली आहेत.व अर्जदार क्र. ३ ते ५ मयत बाबन्ना भूमन्ना तुमीडवार यांची मुले आहेत.मयत मोगलाजी भूमन्ना तुमीडवार यांचा विवाहविना मृत्यू दिनांक १/१/१९९५ रोजी झाला व मयत बाबन्ना भूमन्ना तुमीडवार यांचा मृत्यू दिनांक ७/१/२००७ रोजी मृत्यू झाला. अर्जदारांनी अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्र.१ ते ६ यांना मयत मोगलाजी भूमन्ना तुमीडवार व बाबन्ना भूमन्ना तुमीडवार यांचे वारसा असल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदारांनी मा. न्यायालयात मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील सर्व अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर मयताचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दिनांक २१/१/२०२५ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय व.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

श्री एस. जी. ठाणेदार, दिवाणी न्यायाधीश, २ रे दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, बिलोली यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३/ २०२५

अर्जदार-१.नरसुबाई भ्र.राजन्ना तोटलवार वय -७५ वर्ष, धंदा -घरकाम, २.गोदावरी भ्र.हनमंलू तोटलवार, वय – ४१ वर्ष, धंदा – घरकाम,३.अंबिका पि.भ्र.हनमंलू तोटलवार वय २१ वर्षे धंदा शिक्षण ४.ओमकार पि.भ्र.हनमंल तोटलवार वय १९ वर्षे धंदा शिक्षण वरील सर्व रा.बिलोली ता.बिलोली जि.नांदेड

गैरअर्जदार

निरंक

प्रकरण- मुंबई रेग्युलेशन कायदा कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी, अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे की, मयत नामे हनमंलू राजेन्ना तोटलवार रा. बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड येथील रहिवाशी होते ते दिनांक २२/११/२०२४ रोजी मौजे बिलोली ता.बिलोली जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. मयत हनमंलू राजेन्ना तोटलवार रा. बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड यांचे वारस असल्याचे वारसा प्रमाणपत्र अर्जदारास मिळणेबाबत सदरील अर्ज अर्जदारांनी दाखल केला आहे. त्यानूसार सदरहू जाहिर प्रगटन देण्यात येत आहे की, ज्या कोणास या बाबत हरकती वा आक्षेप असल्यास त्यांनी आपल्या हरकती वा आक्षेप या न्यायालयास दि. १५/२/ २०२५ रोजी पर्यंत सादर कराव्यात. तारखेनंतर आलेल्या हरकती अथवा आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्जदाराचा अर्ज साबीत दिसल्यास वारसाचे प्रमाणपत्र दिले जाईल. करिता हे जाहिर प्रगटण.आज दिनांक : १२९ डिसेंबर, २०२३ रोजी सही व शिक्यानिशी दिले.

**आदेशावरुन**

**लिपीक** **सहा.अधिक्षक**

**दुसरे दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

संचिका क्रमांक. ९३७/४०/क्षे.का.क्र.१ तरोडा- सांगवी/२०२४ २०२५

प्रकरण :- नांव परिवर्तन करणे बाबत.

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री. बालाजी कोंडजी दंडे रा.तरोडा खु नांदेड यांनी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की,तानिभूअ पत्र क्र.१०५१ /९ दिनांक ३०/१०/२००९ तरोडा खु गट नंबर १३६ पैकी प्लॉट क्रमांक २५ पिन ४०६०१०४००४ श्री हरीहर बापुदेव जोशी यांच्या नावे असलेले मालमत्ता यांचेकडून अर्ज खरेदी खत क्रमांक २-८९२८ दिनांक १९/१२/२०२४ च्या अधारे विकत घेतली आहे. / वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नाव करी आकारणी नोंद वहीत घेणेसाठी जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. तरी यां संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहित दाखल करावा.अन्यथा अवधी संपल्यांनतर अर्जदाराच्या नावे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.चर्तु:सिमा :-पुर्वेस -प्लॉट क्रमांक २६,पश्चिमेस -प्लॉट क्रमांक २५ चा उर्वरीत भाग,दक्षिणेस- २० रूंद रोड, उत्तरेस -सुर्वणा इंटरप्राईजेस आहे

**क्षेत्रीय अधिकारी**
**क्षेत्रीय कार्यालय क्र. १ सांगवी तरोडा खु,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,**

## जाहीर प्रगटन

**बिलोली येथील विद्यमान तालुका दंडाधिकारी साहेब बिलोली**

अर्जदार – अब्दुल रहीम शेख अली रा.कुंडलवाडी. ता.बिलोली जि. नांदेड

बिषय- जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी २०२३ ( सुधारीत ) आणि जन्म व मृत्यु नोंदणी अधिकारी १९६९ कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबत.

ज़्याअर्थी अर्जदार अब्दुल रहीम शेख अली रा.कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड वय ५० वर्षे व्यवसाय व्यापार यांचे मयत अजोबा नामे महमद हुसेन मनियार यांचा मृत्यू दिनांक ४/१०/१९७५ ची नोंद मुख्याधिकारी नगरपरिषद कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड येथे जन्म /मृत्यु दाखल्याची मागणीसाठी अर्ज कार्यालयाने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम ११ अन्वये नोंद नसल्याचे लेखी नोंद नसल्याचे लेखी अनुउपलब्धता प्रमाणपत्र दिनांक ३०/७/२०२४ चे पत्र सादर केले आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या वकिलामार्फत या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ (सुधारीत) आणि कलम १३ (३) जन्म व नोंदणी व अधिनियम १९६९ अन्वये अर्जदाराच्या अजोबाच्या मृत्यूची नोंद घेण्यासाठी मुख्याधिकारी नगरपरिषद कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड यांना आदेश देण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

वरील मुख्याधिकारी नगरपरिषद कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड येथे जन्म / मृत्यु ची नोंद घेण्याकरीता आदेश देण्याबाबत जर कुणचा आक्षेप अथवा उजर असेल त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर मा. न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसात आक्षेप / उजर सादर करावा अन्यथ अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २०/१/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी आणि न्यायालयाच्या शिक्यासह देण्यात येते.

**तहसिलदार, बिलोली**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट, पहिला मजला, शिवाजी नगर, नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत धोंडगे बंधुंचा आज भाजपात प्रवेश

### जि.प.शाळेच्या मैदानावर होणार जाहीर सभा



**कंधार (प्रतिनिधी)**– माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत माजी पं.स.सदस्य डॉ.सुनील धोंडगे आणि माजी जि.प.सदस्य ॲड. विजय धोंडगे हे बंधू समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत शुक्रवारी जाहीर प्रवेश करणार आहेत.

शहरातील जि.प. शाळेच्या मैदानात शुक्रवार दि.२४ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता आयोजित जाहीर सभा व पक्ष प्रवेश सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. या सोहळ्याला माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर खासदार डॉ. अजित गोपछडे, विभागीय संघटन मंत्री संजय कौडगे, आ. डॉ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, आ. भिमराव केराम, आ. जितेश आंतापूरकर, आ. श्रीजया चव्हाण, माजी आ. अमरनाथ राजूरकर, राम पाटील रातोळीकर, प्रदेश सरचिटणीस देविदास राठोड, जिल्हाध्यक्ष दक्षिण डॉ.संतुकाराव हंबर्डे, जिल्हाध्यक्ष उत्तर ॲड. किशोर देशमुख, प्रवक्ते संतोष पांडागळे, जिल्हा सरचिटणीस सौ.चित्राताई गोरे, जिल्हा उपाध्यक्ष भगवान राठोड, राष्ट्रीय परिषद सदस्य तुकाराम वारकड, जिल्हा उपाध्यक्ष केरबा बिडवई, माजी सभापती बालाजी पांडागळे, प्रदेश उपाध्यक्ष भविआ देविदास गिते, माजी जि.प.सदस्य चंद्रसेन पाटील, माजी नगराध्यक्ष गजानन सूर्यवंशी, शरद पवार, जिल्हा सरचिटणीस सदाशिव अंबुरे, कंधार तालुकाध्यक्ष ॲड.गंगाप्रसाद यन्नावार, व्यंकट गव्हाणे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष डॉ. जयमंगला औरादकर, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष बाळासाहेब गर्जे, भास्कर ढगे, भास्कर पा.जोमगावकर यांची उपस्थिती राहणार आहेत.

या प्रवेश सोहळ्यास व जाहीर सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुनील धोंडगे, माजी जि.प.सदस्य ॲड. विजय धोंडगे, प्रताप धोंडगे, संदीप धोंडगे यांनी केले आहे.

## गझलकार जयराम धोंगडे यांना 'गझलरत्न' पुरस्कार जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील ज्येष्ठ गझलकार जयराम धोंगडे यांना नुकताच मातोश्री भागाबाई विठ्ठलराव डोंगरे स्मृती प्रतिष्ठान उमरी, जि. नांदेड यांचा राज्यस्तरीय गझलरत्न पुरस्कार जाहीर झाला.

दि. २७ जानेवारी रोजी होणाऱ्या ४ थ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांचे हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. मुदखेड शहरातील येथील रणछोडदास मंगल कार्यालयात प्रसिद्ध साहित्यिक डॉ. जगदीश कदम यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन होत असून अनेक मान्यवर आणि साहित्यिकांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे.

## 'डीपी'मधील ऑईल चोरणारी टोळी जेरबंद; उस्माननगर पोलिसांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** – महावितरणच्या रोहित्रामधून (डीपी) ऑईल चोरणारी टोळी उस्माननगर पोलिसांनी जेरबंद केली. त्यांच्याकडून १ लाख २ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

उस्माननगर ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार व त्यांचे पथक २३ जानेवारी रोजी रात्री गोळेगाव ते शिराढोण मार्गावर पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, रोहित्रामधील ऑईल चोरी करण्याच्या उद्देशाने तेथे असलेले सय्यद हुसेन सय्यद सलीम रा. वाजेगाव, शेख नशीब शेख इब्राहीम रा. देगलुर नाका, सय्यद रज्जाक सय्यद हुसेन रा. वाजेगाव व लालू उर्फ राहुल गायकवाड रा. चौफाळा या चौघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून एक पाईप, लोखंडी पाईप, दोन लोखंडी चैन पाने, पाच रिकामे कॅन, एक ऑटो असा एकूण १ लाख २ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक गजानन गाडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उस्माननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या पथकात हवालदार राम टेकाळे, सुशील कुबडे, नामदेव रेजितवाड, अनिरुध्द वाडे, अप्पाराव यांचा समावेश होता. पथकाचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांनी कौतुक केले.

## लेंडी प्रकल्पासाठी २१८ कोटींचा वाटा देण्यास तेलंगणा सरकार तयार

### खा. रवींद्र चव्हाण यांनी घेतली हैदराबाद मंत्रालयात बैठक



**नांदेड (प्रतिनिधी)** – मुखेड तालुक्यातील लेंडी प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी खासदार रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. हैदराबाद मंत्रालयात झालेल्या यशस्वी चर्चेत तेलंगणा सरकारने त्यांचा उर्वरित २१८ कोटी रुपयांचा हिस्सा देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

तेलंगणा आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांच्या संयुक्त खर्चातून मुखेड तालुक्यातील लेंडी प्रकल्प उभारला जात आहे. दोन्ही सरकारमध्ये झालेल्या करारानुसार तेलंगणा सरकारकडे असलेला २१८ कोटी रुपयांचा वाटा अद्याप न मिळाल्याने प्रकल्पाचे काम रखडले आहे. हा निधी त्वरित मिळावा यासाठी खासदार रविंद्र चव्हाण यांनी थेट हैदराबाद मंत्रालय गाठले. गुरुवार दि. २३ जानेवारी रोजी तेलंगणाचे पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास मंत्री उत्तमकुमार रेड्डी यांच्या सोबत तेलंगणा मंत्रालय, हैदराबाद येथे झालेल्या महत्वाच्या बैठकीत खासदार रविंद्र चव्हाण यांनी तेलंगणा सरकारकडे प्रलंबित असलेला २१८ कोटी रुपयांचा हिस्सा त्वरित उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव ठेवला. यावर दोन्ही बाजूंनी सकारात्मक चर्चा झाली.

या बैठकीस सचिव पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास विभाग प्रशांत पाटील पानपट्टे, माजी आमदार हाणमंतराव पाटील बेटमोगरेकर, काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस श्याम दरक, लेंडी प्रकल्प संघर्ष समिती अध्यक्ष राजू पाटील, सुरेश पंदिलवार, वाकडे, सुभाष बोधने आप्पा, आप्पा दिनेश आवडके आप्पा, संदीप पाटील, दत्ता येवते आदींची उपस्थिती होती. तर जलसंपदा विभागाच्या वतीने उपविभागीय अभियंता लेंडी प्रकल्प विभाग देगलूर लक्ष्मीकांत जाधव यांनी बाजू मांडली.

## जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाची नुतन कार्यकारिणी बिनविरोध



**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाची विसावा हॉटेल मध्ये विशेष सर्व साधारण सभा पार पडली. या सभेत विकास मंडळाची नुतन कार्यकारिणी गठीत करण्यात आली.

सभेच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे संस्थापक तथा महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार हे होते. जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या अध्यक्षपदी चंद्रकांत घाटोळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच पुढील कार्यकारिणी सर्वानुमते बिनविरोध निवडण्यात आली. उपाध्यक्ष सतीश कदम, सचिव गणेश वडगांवकर, सहसचिव भागवत गायकवाड, कोषाध्यक्ष बाबु जल्देवार, तर कार्यकारीणी सदस्य म्हणून बालाजी चंदेल, सत्यनारायण देवरकोंडा, अनुप ठाकुर, गणेश जुजाराव , रामेश्वर पवार, दिपक नरवाडे, बालाजी सुताडे यांची निवड करण्यात आली. यावेळी देवबा डोरले, बापुराव बडुरे, बोरकर, चेतन चौधरी, आदी वृत्तपत्र विक्रेत्यांचा डॉ. भालचंद्र कांगो यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या सभेला संजय गोणे, खय्युम पठाण, विठ्ठल फडेवार, संजय बेरुळकर, चेतन चौधरी, बापुराव बडुरे बरबडा, रामेश्वर बोरकर शिरड शंकर जोशी, संतोष कानगुले, प्रदिप गवारे, अशोक झोळगे, संगमनाथ भालके, आनंदा बोकारे, रमेश वंगलवार, नरेश वंगलवार, अशोक खुणे, युवराज रणवीर, विजय कठारे, दै.सत्यप्रभाचे वितरण व्यवस्थापक गणपत बनसोडे, गणेश रत्नपारखे, शंकर वंगलवार, लक्ष्मण माळवतकर, माधव मामीडवार, शंकर लच्छेवार, राजेश पवार तसेच जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'ॲग्रीकॉस'च्यावतीने मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)** – मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना मराठवाडा कृषी विद्यापीठाची डिलीट ही पदवी मिळाली त्याबद्दल त्यांचा ग्रीकॉस परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार प्रा. रवींद्र चव्हाण पाटील यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित ग्रीकॉस स्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे चेअरमन ॲड अनंत चोंदे पाटील, संचालक पुंडलिकराव कदम, हनुमंत राजे गोरे, नांदेड जिल्हा मराठा उद्योजक कक्ष जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, संतोष मगर, भागवत देवसरकर, मधुकर मोरे, प्रीतम भराडिया, नागेश घुबे, विठ्ठल पावडे, रणजीत चव्हाण आदी उपस्थित होते.

## बुरुड समाजाच्या विकास महामंडळासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार –आ. हरीष पिंपळे

**नांदेड (प्रतिनिधी)** – समाज बांधव या नात्याने समाजाच्या विकासासाठी आपण प्रयत्नशील राहु. तसेच बुरूड समाजासाठी स्वतंत्र विकास महामंडळाची प्रलंबीत असलेली मागणी पूर्ण करणार असल्याचे आश्वासन मुर्तीजापूरचे आमदार हरीष पिंपळे यांनी दिले.

बुरूड समाजाच्या वधु-वर परिचय मेळाव्यासाठी ते दि. २२ रोजी नांदेडमध्ये आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार बालाजी कल्याणकर, संघटनेचे अध्यक्ष मोहनराव पटकोटवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बुरूड समाजासाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, यासाठी आ. कल्याणकर यांना निवेदन देण्यात आले. रामरावजी वडकुते, पांडुरंग करपे, महाराष्ट्र वधु-वर परिचय ग्रुपचे अध्यक्ष कैलास हादगे (डोंबीवली), माजी जि.प.सदस्य बाबुराव नागेश्वर, परभणीचे जिल्हाध्यक्ष सुरेशराव पद्मगीरवार उपस्थित होते. या मेळाव्यात २५० वधु- वरांनी नोंदणी केली.



**नांदेड** : शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या मुंबईस्थित समाधीस जाऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे, प्रकाश मारावार, महेश पाटील, सुनील कदम आदी दिसत आहेत.

## अवैध दारू विक्री करणारी टोळी हिमायतनगर पोलिसांच्या जाळ्यात; पाच जणांना अटक



**नांदेड (प्रतिनिधी)** – पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत हिमायतनगर पोलिसांनी आपल्या हद्दीमध्ये कारवाई करून अवैधरित्या देशी व विदेशी दारू विक्री करणाऱ्या टोळीला अटक केली आहे. त्यांच्याकडून तीस हजार रुपयांचा मुद्देमाल सोबतच दोन तलवार आणि एक खंजर असे घातक शस्त्र जप्त केले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक अमोल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २२ जानेवारी रोजी करण्यात आली.

हिमायतनगर तालुक्यातील खडकी बाजार येथे अवैध दारू विकणारी टोळी सक्रिय झाल्याची माहिती हिमायतनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल भगत यांना मिळाली. त्यांनी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे, सहाय्यक पोलीस अधीक्षक (भोकर ) शफाकत आमना यांच्या आदेशावरून टीमसह त्यांनी खडकी बाजार तालुका हिमायतनगर येथे कारवाई केली. या कारवाईमध्ये ८ हजार ४७० रुपयांची देशी दारू, १५ हजार ८४० रुपयांची विदेशी दारू, १२ हजार १५० रुपये रोख तसेच दोन तलवार आणि एक खंजर असा मुद्देमाल जप्त केला.

यावेळी पोलिसांनी पाच जणांना अटक केली. तर दोन जण घटनास्थळावरून पसार झाले.

यावेळी पोलिसांनी अवैध दारू विक्री करणाऱ्या शेख जिलानी शेख बाबा (वय ५०), वसंत अमरसिंग राठोड (वय ४६), रोहित वसंत राठोड (वय २१), अक्षय लक्ष्मण राठोड (वय २३) आणि तानाजी सदाशिव सोळंकी (वय ४१) सर्व राहणार खडकी बाजार तालुका हिमायतनगर यांना वेगवेगळ्या ठिकाणावरून मुद्देमालासह अटक केली. पोलीस दिसताच मात्र राजू जयस्वाल आणि गजानन जाधव हे दोघेजण पसार झाले. त्या सर्वांविरुद्ध हिमायतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भोकर विधानसभेच्या आ. श्रीजया चव्हाण यांच्या निवडीला उच्च न्यायालयात आव्हान

### मनसेचे साईप्रसाद जटालवार यांची औरंगाबाद खंडपिठात याचिका

**भोकर (प्रतिनिधी)** – नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये पराभूत झालेल्या उमेदवारांनी विजयी उमेदवाराच्या निवडीस आव्हान देणाऱ्या याचिका उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केल्या आहेत. भोकर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाकडून विजयी झालेल्या उमेदवार आमदार श्रीजया चव्हाण यांच्या निवडी विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात मनसेचे पराभूत उमेदवार साईप्रसाद जटालवार यांनी निवडणुक याचिका दाखल करून निवडीला आव्हान दिले आहे.

निवडणूक प्रक्रिये दरम्यान भारतीय जनता पक्षाचे उमेदवार श्रीजया अशोकराव चव्हाण यांनी त्यांचे नामनिर्देशन पत्र दाखल करताना त्यांच्या शपथपत्रात आवश्यक असलेली काही माहिती लपवून शपथपत्र सादर केले होते. याचिकेत नमूद केल्यानुसार, चव्हाण यांच्या दबावाखाली येऊन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांच्या नामनिर्देशन पत्रावर घेण्यात आलेला आक्षेप स्विकारला नाही. तसेच इतर दोन उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र बेकायदेशीररित्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अवैध ठरविले होते. भाजपा उमेदवार निवडूण यावे याकरिता भाजप उमेदवाराच्या कार्यकर्त्यांनी सदर विधानसभा निवडणुकीमध्ये अनेक गैरमार्गाचा वापर केला मतदारांना पैशाचे आमिष दिले. मतदारांना मतदान करण्यासाठी पैशांचे वाटप करण्यात आले. तसेच त्यांच्या विरोधात मतदान जाईल ह्या भीतीने मतदारांना डांबुन ठेवण्यात आले, अशा प्रकारचे अनेक व्हिडिओ व बातम्या निवडणुक काळात सोशल मीडियावर व्हायरल झाल्या होत्या. सदरचे अनेक सबळ पुरावे व अनेक मतदारांचे शपथपत्र सन्माननिय उच्च न्यायालयात सादर करण्यात आलेले आहेत व करणार आहेत.

सदरील निवडणुकीचा निकाल जनसामान्यांच्या मनातला निकाल नसून निवडणुकीमध्ये गैरमार्गाचा वापर करून आलेला निकाल आहे. त्यामुळे सदर निवडणूक रद्द व्हावी यासाठी निवडणुक याचिका दाखल केली असल्याचे मनसेचे भोकर तालुकाध्यक्ष साईप्रसाद जटालवार यांनी सांगितले. आता या प्रकरणात उच्च न्यायालय काय निर्णय घेईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com